RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. 11 जून 2026



१९५०- सिध्दार्थ कॉलेज विद्यार्थी संसदेत हिंदू कोड बिल यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विशेष व्याख्यान.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

गुरूवार ११ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १६१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Thursday, 11 June 2026 | Year : 6 | Issue : 161 | Daily | Rate: Rs. 5/-

# 'कॉक्रोच जनता पार्टी'चे आजपासून देशव्यापी आंदोलन

## १ कोटी विद्यार्थ्यांचे नुकसान, ७ आत्महत्या; जबाबदारी स्वीकारा

**पुणे :** "देशातील शिक्षण व्यवस्थेचे अपयश आणि 'नीट' परीक्षांमधील पेपरफुटीमुळे ६ ते ७ निष्पाप विद्यार्थ्यांना आपल्या प्राणांना मुकावे लागले आहे. विविध परीक्षांच्या गोंधळामुळे तब्बल १ कोटीहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असतानाही, सरकारमधील कोणीही याची जबाबदारी घेण्यास तयार नाही. या संपूर्ण अपयशाला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हेच जबाबदार असून त्यांनी तातडीने राजीनामा द्यावा. या मागणीसाठी देशव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असून याची सुरुवात पुण्यातून होणार आहे ," अशी आक्रमक मागणी 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी आज पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत केली.

पुण्यात उद्या दुपारी चार वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात शांततेच्या मार्गाने आंदोलन करणार आहोत, त्यानंतर अमृतसर, लखनऊ ,जयपुर, बंगळुरू या ठिकाणीही आंदोलन केली जाणार आहे. या दरम्यान धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नाही मिळाला तर २० जून रोजी दिल्ली येथे देशव्यापी आंदोलन केले जाईल आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यशिवाय परत जाणार नाही असा निर्धारही अभिजीत दिपके यांनी यावेळी व्यक्त केला. कॉकरोच जनता पार्टीची कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. मात्र, तरुणांच्या प्रश्नांवर कोणाला आम्हाला समर्थन द्यायचे असेल तर स्वागत आहे असे नमूद करत अभिजीत दिपके म्हणाले की, एका राजीनाम्याने व्यवस्था बदलणार नाही याची कल्पना आहे. पण आपली चूक मान्य करत नसतील आणि जबाबदारीच घेत नसतील तर राजीनामा हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. आपली मुले राजकारणावर बोलतात याची आता आई-वडिलांना भीती वाटत आहे. मी अमेरिकेला जाताना आई जेवढी रडली नव्हती तेवढी ती मी परत आल्यावर रडली. तिला भीती होती की माझ्यावर हल्ला होईल. ही भीती प्रत्येक आई-वडिलांना वाटत आहे, माझे एकच सांगणे आहे की, मुलांना बोलण्यापासून रोखू नका. जेव्हा हजारो, लाखो विद्यार्थी बोलायला लागतील तेव्हा यांचा आवाज दाबण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. प्ले स्टेशन खेळता खेळता सुरू झालेल्या या चळवळीला आता अत्यंत व्यापक स्वरूप आले आहे. ही चळवळ केवळ समाज माध्यमांपुरती मर्यादित न ठेवता, आता ती जमिनीवर आणून थेट आंदोलन सुरू करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या या लढ्यासाठी मी अमेरिकेतील माझी नोकरी सोडून दिली असून, आता भारतातच कायमस्वरूपी राहून हा लढा पुढे नेणार आहे," असा निर्धारही अभिजीत दीपके यांनी यावेळी व्यक्त केला.



# काँग्रेस-तृणमूल एकत्र येणार?

**कोलकत्ता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आहे. फक्त ६० आमदारच ममता बॅनर्जींपासून वेगळे झाले नाहीत, तर २० हून अधिक खासदारांनीही बंडखोरी दर्शवली आहे. या फुटीमुळे ममता बॅनर्जी यांना सोनिया गांधी यांनी विलीनीकरणाचा प्रस्ताव दिला, तो त्यांनी स्वीकारण्यास सहमती दर्शवली आहे. ममता बॅनर्जी टीएमसीचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्यास तयार आहेत, पण त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांनी राहुल गांधींसोबतच्या बैठकीत एक अट ठेवली आहे. त्यांनी म्हटले आहे की, काँग्रेसने ममता बॅनर्जी यांना राज्यसभेत पाठवावे आणि तेथे त्यांना विरोधी पक्षनेतेपदही द्यावे. सध्या राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे आहे. निवडणुकांनंतर, ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली टीएमसीमध्ये मोठी फूट पडली. अठ्ठावन्न आमदारांनी एकमताने त्यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली आणि विधानसभेच्या अध्यक्षांना या पदाची माहिती दिली. यानंतर, टीएमसीमध्ये लोकसभा आणि राज्यसभेतही मोठी फूट पडू शकते अशी भीती निर्माण झाली. अनेक टीएमसी खासदारांनी ममता बॅनर्जी यांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली. सुखेंदू शेखर रॉय आणि सुष्मिता देव यांच्यासह अनेक खासदारांनी राजीनामे दिले. दरम्यान, लोकसभेत एकेकाळी ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्ती असलेल्या काकोली घोष यांच्या नेतृत्वाखाली २० हून अधिक खासदारांनी बंड केले. यामध्ये सयोनी घोष यांचाही समावेश आहे. खासदार राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांची बुधवारी दिल्लीत भेट झाली. विरोधी आघाडीकडून समन्वय मजबूत करण्यासाठी आणि एकता टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली. दरम्यान, या भेटीआधी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.



या भेटीत सोनिया गांधी यांनी विलीनीकरणानंतर ममता बॅनर्जी यांना राष्ट्रीय उपाध्यक्षपदाचा, तर अभिषेक बॅनर्जी यांना काँग्रेस सरचिटणीसपदाचा प्रस्ताव दिला. मात्र, ममता बॅनर्जी यांनी या प्रस्तावावर विचार करण्यासाठी काही दिवसांची मुदत मागितली आहे.

# महत्वाच्या बातम्या

## १९७ जिल्ह्यांना मान्सूनवर अल निनोचा नकारात्मक प्रभाव



**नवी दिल्ली :** प्रशांत महासागरात उदयास येत असलेल्या अल निनो प्रणालीमुळे मान्सूनच्या पावसात लक्षणीय घट होण्याची शक्यता लक्षात वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तयारी सुरू केली आहे. सर्वाधिक प्रभावित होण्याची शक्यता असलेले १९७ जिल्हे चिन्हांकित करण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. अल निनोच्या परिणामांना तोंड देण्यासाठी आपत्कालीन योजना तयार करत असल्याचेही ते म्हणाले.

परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून हा आकडा वाढू शकतो. पावसाचे स्वरूप बदलू शकते, त्यामुळे बियाण्यांची व्यवस्था केली जात असून, गरज असेल तिथे इतर पिके घेण्याविषयी शेतकऱ्यांना सूचित केले जात आहे, असेही त्यांनी सांगितले. तसेच विकासित भारत जी राम जी योजनेसंदर्भात चौहान म्हणाले की, १ जुलैपासून मनरेगाच्या जागी राबविण्यात येणाऱ्या नवीन योजनेसाठी १.२५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## 'बोगस' जन्मप्रमाणपत्रांचा स्फोट




**अमरावती :** शासकीय सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून चक्क 'बेनामी' आणि 'अतिरिक्त ओळख' तयार करून देणारा एक अत्यंत धक्कादायक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेला आव्हान देणारा 'जन्म प्रमाणपत्र घोटाळा' उघडकीस आला आहे. याप्रकरणी राज्य शासनाने गंभीर दखल घेत 'एसआयटी' गठित केली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील तब्बल १९,९६४ बोगस जन्म प्रमाणपत्र देणारे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थ्यांची कसून चौकशी सुरू झाली आहे. या घोटाळ्याचे धागेदोरे आता थेट अमरावती महापालिकेपर्यंत पोहोचले असून, येथेही हजारो संशयास्पद नोंदी झाल्याचे उघड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महापालिका आणि नगरपालिकांमध्ये जुने जन्म प्रमाणपत्र केंद्र सरकारच्या 'सीआरएस' पोर्टलवर अपलोड करताना मूळ कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात आला. नियमानुसार जुने प्रमाणपत्र जसेच्या तसे अपलोड करायचे असते. मात्र, अमरावती मनपाच्या जन्म-मृत्यू विभागात 'स्पेलिंग करेक्शन' आणि 'नावात सुधारणा' करण्याच्या बहाण्याने थेट नवीन आणि बनावट व्यक्तीच जन्माला घालण्यात आल्या.

# २२ जूनपासून पावसाळी अधिवेशन

## सत्ताधा-यांना घेरण्यासाठी विरोधकांकडे अनेक मुद्दे

**नागपूर :** अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर आता पावसाळी अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनाची तारीख विधिमंडळ सचिवालयाकडून निश्चित करण्यात आली आहे. राज्यातील परिस्थिती बघता हे अधिवेशनही वादळी ठरणार असल्याचे संकेत आहे. यात अनेक मुद्द्यांवर विरोधकांकडून सरकारला घेण्याचा प्रयत्न होईल. यावर मात करण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांचे काही मुद्दे उचलून धरण्याची शक्यता आहे.

वर्षातून साधारणतः किमान तीन अधिवेशन होतात. यातील एक अधिवेशन हे नागपुरात होते. आतापर्यंत सर्वाधिक वेळा हिवाळी अधिवेशन नागपुरात झाले असून बोटावर मोजण्याइतकेच पावसाळी अधिवेशन झाले. नागपूर येथे विधिमंडळाच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. यासाठी एक हजार कोटीच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. हे काम याच वर्षीपासून सुरू होईल,असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तसे झाल्यास यंदाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होणार नसल्याची चर्चा होत आहे.

पावसाळी अधिवेशनाचे कामकाज सोमवार २२ जूनपासून मुंबई येथे सुरू होणार आहे. विधानसभेचे कामकाज सकाळी ११ वाजतापासून सुरू होईल. तर विधान परिषदेचे कामकाज दुपारी १२ वाजतापासून सुरू होईल. राज्याचे राज्यपाल विष्णू देव वर्मा यांच्या मान्यतेने विधिमंडळ सचिवांकडून याबाबतची अधिसूचना काढण्यात आली आहे.

# MPSC लेखी परीक्षेचा निकालच नाही, थेट मुलाखतीचे वेळापत्रक जाहीर; विद्यार्थी संतापले

**नागपूर:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा (एमपीएससी) पुन्हा एक नवीन गोंधळ समोर आला आहे. यामुळे आयोगावरील असलेला विश्वास पुन्हा ढासळला आहे. आयोगाने एका परीक्षेचा निकाल अद्यापही जाहीर केलेला नाही. असे असतानाही मुलाखत कार्यक्रम जाहीर करण्यात आला. विशेष म्हणजे या सर्व मुलाखती पाच दिवसांवर आलेल्या आहेत. सर्व मुलाखती मुंबईला होणार आहेत. परंतु, कुठल्या उमेदवाराची मुलाखतीसाठी निवड झाली हेच माहिती नसल्याने प्रचंड अडचण निर्माण झाली आहे.

एमपीएससीच्यावतीने माहिती व जनसंपर्क महासंचालयातील वरिष्ठ सहायक संचालक, वरिष्ठ उपसंपादक पदासाठी मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून १६ आणि १७ जूनला मुलाखती होणार आहेत. मुलाखती अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत, तरीही अद्याप या पदाच्या लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. या परिस्थितीत उमेदवारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. 'एमपीएससी'च्या विविध परीक्षा आणि निकालाला गती आली आहे. असे असले तरी अनेक परीक्षांमधील गोंधळ अद्यापही कायम असल्याने उमेदवारांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर एमपीएससीने माहिती व जनसंपर्क संचालयालयाच्या विविध पदांसाठी मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर केला. यातील काही पदांच्या मुलाखतीही झाल्या. मात्र, जाहिरात क्रमांक १३० मधील वरिष्ठ सहायक संचालक, वरिष्ठ उपसंपादक, जनसंपर्क अधिकारी गट अ या मुलाखती कार्यक्रम जाहीर करण्यात आला. यानुसार १६ आणि १७ जूनला उमदेवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहे. अपात्र उमदेवारांची यादी आयोगाने जाहीर केली आहे. मात्र, पात्र उमेदवारांची यादी अद्यापही जाहीर झालेली नाही. तसेच मुलाखतीसाठी कुठल्याही उमेदवारांना ई-मेल किंवा संदेशही पाठवण्यात आलेला नाही. त्यामुळे उमेदवारांची चिंता वाढली आहे. पाच दिवसांवर मुलाखती आल्या आहेत.





# ओबीसी जनगणनेचा वाद पेटला!

**भंडारा :** जिल्ह्यातील लाखनी येथे जनगणना प्रक्रियेला वेगळे वळण मिळाले असून, जनगणनेसाठी आवश्यक माहिती देण्यास नकार दिल्याप्रकरणी लाखनी नगरपंचायतीने एका नागरिकाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे ओबीसी जनगणना आणि स्वतंत्र प्रवर्गाच्या मागणीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

लाखनी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी आशिष घोडे यांनी प्रभाग क्रमांक ९ मधील रहिवासी आणि ओबीसी सेवा संघ लाखनीचे अध्यक्ष उमेश सिंगनजुडे यांना ८ जून २०२६ रोजी नोटीस जारी केली. जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. माहिती न दिल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा नगरपंचायतीने दिलेल्या नोटिशीनुसार, घर व कुटुंबाची माहिती संकलित करण्यासाठी नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षक यांनी वारंवार भेट देऊनही आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ८ नुसार नागरिकांनी माहिती देणे बंधनकारक असून, कलम ११ नुसार माहिती देण्यास नकार देणे किंवा शासकीय कामात अडथळा निर्माण करणे हा दंडनीय प्रकार मानला जातो. त्यामुळे संबंधितांनी तातडीने लेखी स्पष्टीकरण सादर करावे, अन्यथा पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नोटिशीत देण्यात आला आहे.

# सावित्रीबाई फुले मालिका बंद पडताना नाना पाटेकर, प्राजक्ता माळी गप्प का? जितेंद्र आव्हाड

**मुंबई :** मी सावित्रीबाई फुले बोलतेय ही मालिका बंद पडणार आहे. अमोल कोल्हे हे या मालिकेत ज्योतिराव फुलेंच्या भूमिकेत तर मधुराणी गोखले प्रभुलकर ही अभिनेत्री या मालिकेत सावित्रीबाईंच्या भूमिकेत आहे. ही मालिका बंद होणार असल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी खंत व्यक्त केली. तसंच नाना पाटेकर, प्राजक्ता माळी, जितेंद्र आव्हाड यांच्यासारखे कलाकार अशावेळी गप्प का बसतात असा सवालही त्यांनी केला. अमोल कोल्हेंनी जो विषय काढला की महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुलेंची मालिका बंद करण्यात आली. २०१४ पासून म्हणजेच मोदी सरकार आलं तेव्हापासून विचारांचं स्वातंत्र्य हिरावून घेण्याचं काम मोदी सरकार सातत्याने करतं आहे. नथुरामाची भूमिका अमोल कोल्हे तुम्ही घेतलीत तेव्हा त्याचा सर्वात आधी विरोध करणारा मी होतो आणि मला त्याचा अभिमान आहे. मला शरद पवार साहेबही ओरडले होते की तू अशी भूमिका घ्यायला नको होतीस. मी भूमिका कधीही मागे घेत नाही. तुमच्या त्या भूमिकेला माझा विरोध होता आणि राहिल. मी नथुराम बोलतोय हे नाटक मी अनेकदा बंद पाडलंय, तेव्हा लाठ्या काठ्या खाल्ल्या आहेत. आता अमोल कोल्हे ज्योतिबांची भूमिका करत आहेत. त्यांच्या मालिकेसाठी मी १० लाख रुपयांची देणगी जाहीर करतो असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. तिंद्र आव्हाड पुढे म्हणाले, मला हसू या गोष्टीचं येतं की नाना पाटेकर कायम एका स्टाईलमध्ये बोलत असतात. नाना पाटेकर थोर विचारवंतांपैकी एक आहेत. मग जेव्हा असे प्रसंग येतात, तेव्हा नाना पाटेकर असतात कुठे? महात्मा फुलेंची मालिका बंद पडली आहे तर नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांनी बोललं पाहिजे. प्राजक्ता माळी ताई आहेत त्यांनी बोलायला पाहिजे. मला आठवतं आहे की आणीबाणीचा काळ होता तेव्हा आंधी चित्रपटावर बंदी आली तेव्हा कैफी आझमी, देवानंद आणि इतर कलाकार इंदिरा गांधींविरोधात उभे राहिले. सर्वसामान्य आणि चित्रपटांचा जवळचा संबंध असतो. प्रत्येक जण स्वतःला त्या भूमिकेत बघायचा. अमिताभने एक ढिशूम केलं की खालून ढिशूमचे १०० आवाज यायचे.



# सीसीटीव्हीच्या नावावर कोट्यवधींचा कथित घोटाळा?



## सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालयांतील सुरक्षेच्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**नागपूर :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली सरकारी तिजोरीवर कोट्यवधी रुपयांचा बोजा टाकला. शासकीय अभियांत्रिकी व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीच्या नावाखाली मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. विशेष म्हणजे, ज्या वसतिगृहांमध्ये आधीपासूनच सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत होती, त्याच ठिकाणी पुन्हा नव्याने कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतल्याने संशय अधिक गडद झाला आहे. या प्रकरणात तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, अभियांत्रिकी संचालनालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तंत्रशिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयांच्या परिसरात, विशेषतः मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याचे निर्देश दिले होते. या संदर्भात तत्कालीन संचालक डॉ. मोहितकर यांनी सर्व महाविद्यालयांना पत्र पाठवून शासन निर्णयाचा संदर्भ देत तातडीने निधी जमा करण्याचे आदेश दिले. संभाजीनगर व कराड येथील यंत्रणांना संदर्भित करत दोन टप्प्यांत धनादेशाद्वारे संपूर्ण आगाऊ रक्कम जमा करण्यास सांगण्यात आले. संचालनालयाच्या आदेशानुसार अनेक महाविद्यालयांनी कोणतीही शंका न घेता लाखो रुपयांचे धनादेश सुपूर्द केले. मात्र, निधी जमा झाल्यानंतरही अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कामाला गती मिळाली नाही. काही संस्थांमध्ये केवळ नाममात्र काम सुरू करण्यात आले, तर काही ठिकाणी आजतागायत यंत्रणा पूर्णत्वास गेली नसल्याचे समोर आले आहे.

विदर्भातील दोन प्रमुख शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांची आकडेवारीच या कथित गैरव्यवहाराची व्याप्ती दाखवून देते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर यांनी तब्बल ७१ लाख १६ हजार १४४ रुपये, तर नागपूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने ३६ लाख ३१ हजार ६४० रुपये खर्चासाठी दिल्याची माहिती समोर आली आहे. मार्च-एप्रिल २०२५ दरम्यान ही रक्कम जमा करण्यात आली. मात्र, इतका प्रचंड निधी खर्च होऊनही प्रत्यक्षात सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे उभारली गेली नसल्याचा आरोप आहे. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, अनेक वसतिगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा आधीपासूनच अस्तित्वात होती. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक सुविधा कार्यरत असताना पुन्हा नव्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्याची आवश्यकता काय होती, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे. कोणताही अभ्यास, गरजांचे मूल्यमापन किंवा नियोजन न करता अवाढव्य खर्चाचा निर्णय घेतला गेला का, याची चर्चा आता शैक्षणिक वर्तुळात सुरू झाली आहे.

शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली खर्च झालेली ही कोट्यवधींची रक्कम प्रयोगशाळा सुसज्ज करण्यासाठी, आधुनिक यंत्रसामग्री खरेदीसाठी, संशोधन सुविधांसाठी किंवा वसतिगृहांच्या मूलभूत गरजा सुधारण्यासाठी वापरली असती, तर हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा मिळाली असती. अनेक सरकारी महाविद्यालये आजही अपुऱ्या पायाभूत सुविधांशी झुंज देत असताना, अशा प्रकारे निधी खर्च होणे गंभीर बाब मानली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बानाई संघटनेचे अध्यक्ष अरविंद गेडाम यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन पाठविण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान संचालक डॉ. मोहितकर या महिन्या अखेर सेवानिवृत्त होत आहेत. तदनंतर नव्या पदावर नियुक्त मिळावी.यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले असल्याची चर्चा रंगत आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असताना अशा अधिकाऱ्यांना पुन्हा जबाबदारी देणे योग्य ठरेल का, असा सवाल उपस्थित होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या नावाखाली जर खरोखरच कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असेल, तर हा केवळ आर्थिक घोटाळा नाही. तर तो शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला हादरा देणारा प्रकार ठरेल. कारण ज्या पैशातून विद्यार्थ्यांचे भविष्य उजळू शकले असते, तो निधी जर कागदोपत्री कामांमध्ये अडकला असेल, तर ती केवळ प्रशासकीय चूक नसून सामाजिक अन्याय ठरेल.



11 June 2026 page 02-n_Layout 1 6/10/2026 6:57 PM Page 1



# संपादकीय

## उपवर्गीकरण व ऐक्याची लढाई नागपूर ते मंत्रालय : न्यायाची हाक

महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून त्याच्या समर्थनार्थ आणि विरोधात विविध स्तरांवर चर्चा सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर २० जून २०२६ रोजी नागपूर येथे आणि त्यानंतर २६ जून २०२६ रोजी मुंबईतील मंत्रालयावर निघणाऱ्या भव्य महामोर्चामुळे या विषयाला राज्यव्यापी महत्त्व प्राप्त झाले आहे. नागपूरमधील मोर्चा हा केवळ एका शहरापुरता मर्यादित नसून विदर्भातील जनमत संघटित करण्याचा आणि समाजात जनजागृती निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून गावोगावी, तालुक्यांमध्ये तसेच विविध बुद्ध विहारांमध्ये बैठका, जनजागृती सभा आणि संपर्क अभियानांना सुरुवात झाली असून या आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आरक्षण हा केवळ शासकीय नोकऱ्या किंवा शैक्षणिक प्रवेश मिळविण्याचा विषय नाही. तो सामाजिक न्याय, समान संधी आणि ऐतिहासिक अन्यायाच्या परिमार्जनाशी निगडित आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी आरक्षणाची संकल्पना मांडली. या व्यवस्थेचा मूलभूत उद्देश समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा होता. त्यामुळे आरक्षण व्यवस्थेतील कोणताही बदल करताना अत्यंत संवेदनशीलता, अभ्यासपूर्ण दृष्टिकोन आणि सर्व संबंधित समाजघटकांचा सहभाग आवश्यक आहे. आज उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून अनुसूचित जातींमध्ये मतभेद निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. काही समाजघटकांचे म्हणणे आहे की, आरक्षणाचा लाभ काही जातींपुरता अधिक केंद्रित झाला असून इतर अनेक घटकांना अपेक्षित संधी मिळालेल्या नाहीत. त्यामुळे आरक्षणाचे उपवर्गीकरण करून लाभांचे अधिक न्याय्य वाटप व्हावे, अशी त्यांची भूमिका आहे. दुसरीकडे उपवर्गीकरणाचे विरोधक असा युक्तिवाद करतात की, या प्रक्रियेमुळे अनुसूचित जातींमध्ये परस्पर संशय, स्पर्धा आणि संघर्ष वाढू शकतो. सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विभाजन होणार असेल तर त्याचा गंभीरपणे पुनर्विचार होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर येथे २० जून रोजी आयोजित करण्यात आलेला महामोर्चा विशेष महत्त्वाचा ठरत आहे. विदर्भातील विविध जिल्ह्यांतून हजारो कार्यकर्ते, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, बुद्ध विहारांचे पदाधिकारी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होणार असल्याचे चित्र आहे. नागपूर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची भूमी असल्यामुळे या आंदोलनाला विशेष वैचारिक आणि सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. या मोर्चाच्या माध्यमातून उपवर्गीकरणाला विरोध नोंदविण्याबरोबरच अनुसूचित जातींच्या ऐक्याचा संदेश देण्याचा प्रयत्न होत आहे. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या उपवर्गीकरण विरोधी संघर्ष परिषदेत विविध अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन २६ जून रोजी मंत्रालयावर महामोर्चा काढण्याचा निर्धार व्यक्त केला. रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या परिषदेमुळे अनुसूचित जातींच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीला नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागपूरचा मोर्चा हा या राज्यव्यापी आंदोलनाचा प्रारंभिक आणि महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. परिषदेत उपस्थित वक्त्यांनी बदर समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. समितीच्या अहवालाबाबत पुरेशी पारदर्शकता नसल्याचा आरोप करण्यात आला. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही समितीचा अहवाल जनतेपासून लपवून ठेवणे योग्य ठरत नाही. संबंधित समाजघटकांना माहिती मिळणे, हरकती नोंदविण्याची संधी मिळणे आणि त्यांची बाजू मांडता येणे हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. त्यामुळे सरकारने या विषयावर अधिक स्पष्ट आणि पारदर्शक भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. भारतीय संविधान समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित आहे. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर चर्चा करताना ही मूल्ये केंद्रस्थानी ठेवली गेली पाहिजेत. कोणत्याही एका समाजघटकाच्या हिताला संपूर्ण अनुसूचित जातींचे हित समजणे योग्य नाही. त्याचप्रमाणे एका जातीला दोष देऊन किंवा दुसऱ्या जातीविरुद्ध वातावरण निर्माण करूनही हा प्रश्न सुटणार नाही. सर्व समाजघटकांच्या अनुभवांचा आणि मागण्यांचा सन्मान राखूनच या विषयावर पुढे जाणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला संघटित होण्याचा संदेश दिला होता. “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा त्यांचा मंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे. मात्र संघटनाऐवजी विभाजनाची प्रक्रिया सुरू झाली तर त्याचा फायदा सामाजिक न्यायाच्या विरोधात असलेल्या शक्तींनाच होणार आहे. त्यामुळे उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात भूमिका घेताना परस्पर सन्मान आणि संवाद कायम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्राला महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक परिवर्तनाची महान परंपरा लाभली आहे. या परंपरेने समाजाला समतेचा आणि बंधुत्वाचा मार्ग दाखविला आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर मतभेद असले तरी ते लोकशाही मार्गाने आणि संविधानिक चौकटीत सोडविणे हीच महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला साजेशी भूमिका ठरेल. सरकारनेही या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय विषय म्हणून पाहू नये. हा लाखो नागरिकांच्या भविष्याशी संबंधित विषय आहे. त्यामुळे सर्व संबंधित संघटना, अभ्यासक, तज्ज्ञ आणि समाजप्रतिनिधी यांच्यासोबत व्यापक चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. कोणताही निर्णय घाईघाईने घेतला गेला तर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. आज देशात बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, आर्थिक विषमता आणि सामाजिक भेदभाव यांसारखी गंभीर आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत अनुसूचित जातींमधील अंतर्गत संघर्ष वाढविण्याऐवजी त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. आरक्षणाच्या मर्यादित चौकटीत एकमेकांविरोधात उभे राहण्याऐवजी शिक्षण, उद्योग, उद्योजकता आणि कौशल्यविकास यावर अधिक भर दिला पाहिजे. २० जून रोजी नागपूर येथे आणि २६ जून रोजी मंत्रालयावर निघणारे महामोर्चे हे केवळ आंदोलन नसून सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि अनुसूचित जातींच्या ऐक्याची कसोटी ठरणार आहेत. या आंदोलनांचा केंद्रबिंदू कोणत्याही जातीविरोधात भूमिका घेणे नसून समाजातील सर्व घटकांच्या हक्कांचे रक्षण आणि न्याय्य धोरणांची मागणी करणे हा असला पाहिजे. संघर्षाची दिशा विभाजनाकडे नव्हे तर एकतेकडे, वैमनस्याकडे नव्हे तर संवादाकडे आणि असंवैधानिकतेकडे नव्हे तर संविधानिक मूल्यांच्या संरक्षणाकडे असली पाहिजे. उपवर्गीकरणाचा प्रश्न कितीही गुंतागुंतीचा असला तरी त्याचे उत्तर सामाजिक सलोखा, न्याय, समानता आणि बंधुता या मूल्यांमध्येच दडलेले आहे. अनुसूचित जातींच्या हक्कांचे संरक्षण करताना त्यांच्या ऐक्यालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. कारण एकजूट असेल तरच संघर्षाला ताकद मिळते, आंदोलनाला दिशा मिळते आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याला यश प्राप्त होते. आजची खरी गरज ही विभाजनापेक्षा एकतेची, आरोप-प्रत्यारोपांपेक्षा संवादाची आणि भावनिक घोषणांपेक्षा संविधानिक व तथ्याधारित भूमिकेची आहे. हाच संदेश नागपूर आणि मुंबईतील महामोर्चांमधून समाजासमोर जाणे अपेक्षित आहे. ●●

# संविधानिक मूल्यांची पेरणी

## समतामूलक भारताच्या निर्मितीचा खरा मार्ग

कोणत्याही राष्ट्राची खरी ताकद केवळ त्याच्या अर्थव्यवस्थेत, लष्करी सामर्थ्यात किंवा भौतिक विकासात नसते; ती त्या राष्ट्राच्या मूल्यव्यवस्थेत असते. भारताची मूल्यव्यवस्था घडविणारे, समाजाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखविणारे सर्वोच्च दस्तऐवज म्हणजे भारतीय संविधान. आजच्या काळात संविधान केवळ पुस्तकांच्या पानांपुरते मर्यादित न राहता ते लोकांच्या विचारांमध्ये, वर्तनामध्ये आणि सामाजिक व्यवहारामध्ये रुजणे ही काळाची गरज आहे. संविधानाची हीच जाणीव समाजात निर्माण करण्यासाठी काही व्यक्ती आयुष्यभर अविरत कार्य करत असतात. निवृत्त आयएएस अधिकारी ई. झेड. खोब्रागडे हे त्यापैकी एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी संविधान फाउंडेशन निर्माण करून त्याद्वारे संविधान व्याख्यानमालेचे आयोजन सुरू केले आहे आणि आता या संस्थेद्वारे संविधान सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन होत आहे ही खूप अभिमानाची गोष्ट आहे. मागील दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी संविधान साक्षरता, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार आणि सामाजिक प्रबोधनासाठी विविध उपक्रम राबवून एक प्रकारची चळवळच उभी केली आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत संविधानाचा संदेश पोहोचावा, नागरिकांनी आपल्या हक्कांसोबत कर्तव्यांचीही जाणीव ठेवावी आणि लोकशाही अधिक सशक्त व्हावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. सेवाकाळात आणि निवृत्तीनंतरही संविधानाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी भरीव प्रयत्न केले आहेत. वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असताना त्यांनी संविधान ओळख आणि प्रास्ताविका वाचन हा उपक्रम वर्धा जिल्ह्यात सुरू केला होता. 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यासाठी त्यांनी राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. बीबीसी मराठीला दिलेल्या मुलाखतीत ते संविधानाचे महत्व, संविधानिक संस्थांची जबाबदारी, नागरिकांचा संविधानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर सविस्तर बोलले आहेत. महाराष्ट्राची गोष्ट या मालिकेत बीबीसी मराठीचे संपादक अभिजीत कांबळे यांनी ही मुलाखत घेतली आहे. या मुलाखतीत इ. झेड. खोब्रागडे सरांनी व्यक्त केलेले त्यांचे विचार खरेच खूप विचारप्रवर्तक असे आहेत; ते म्हणतात, ‘भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशभर संविधान जागृतीचे विविध उपक्रम राबवले जात आहेत. मात्र, संविधानाचा खरा अर्थ केवळ त्याचा गौरव करण्यात नसून, त्यातील मूल्ये आणि तत्त्वे प्रत्यक्षात राबविण्यात आहे. आज राजकीय पक्ष संविधानाच्या चौकटीत राहून सत्तेत येतात; परंतु सत्ता मिळाल्यानंतर संविधानाची उद्दिष्टे पूर्ण करण्यापेक्षा नुसता पक्षविस्तार आणि पक्ष-अजेंडा राबविण्यावर भर दिला जात असल्याचे दिसते. दुसरीकडे, संविधानाविषयी जनजागृतीचा अभाव असल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या अधिकारांची पुरेशी माहिती नसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते की, संविधान कितीही चांगले असले तरी ते राबविणाऱ्यांची प्रामाणिकता महत्त्वाची असते. न्यायपालिका, कार्यपालिका आणि कायदेमंडळ या लोकशाहीच्या तीन स्तंभांनी संविधाननिष्ठ राहून काम केले तरच सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक न्याय सर्वांपर्यंत पोहोचू शकेल. संविधानाचा खरा सन्मान त्याचे पुस्तक नुसते हातात घेण्यात नाही, तर त्यातील मूल्ये शासनव्यवस्था आणि समाज जीवनात प्रामाणिकपणे रुजविण्यात आहे.’ आज जेव्हा समाजात अंधश्रद्धा, असहिष्णुता, विषमता आणि द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत, तेव्हा संविधानिक मूल्यांचा प्रचार ही केवळ सामाजिक गरज नाही तर राष्ट्रीय जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत संविधान फाऊंडेशनच्या माध्यमातून संविधानिक मूल्यांच्या प्रसारासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना सन्मानित करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचा आहे. पुरस्कार हे केवळ सन्मानचिन्ह नसतात; ते समाजाला दिशा देणारे दीपस्तंभ असतात. एखाद्या व्यक्तीच्या कार्याची दखल घेतली जाते तेव्हा त्या व्यक्तीला नवचैतन्य मिळते, त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि त्याच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होते. त्याचवेळी इतर अनेक व्यक्तींनाही प्रेरणा मिळते की, समाज परिवर्तनासाठी केलेले कार्य व्यर्थ जात नाही. त्यामुळे अशा पुरस्कारांची भूमिका केवळ गौरवापुरती मर्यादित राहत नाही, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहिताना केवळ कायद्याचा ग्रंथ तयार केला नव्हता; त्यांनी भारताच्या भविष्याचा रोडमॅप तयार केला होता. हा रोडमॅप समतेचा आहे, विज्ञाननिष्ठ विचारांचा आहे, सामाजिक न्यायाचा आहे आणि सर्वसमावेशक विकासाचा आहे. या मार्गावर चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान राष्ट्रनिर्मितीसाठी अनमोल आहे. त्यामुळे अशा कार्यकर्त्यांचा सन्मान करणे म्हणजे प्रत्यक्षात संविधानाच्या मूल्यांचाच सन्मान करणे होय. समाज परिवर्तन ही एकट्या व्यक्तीची लढाई नसते. विचारांची पेरणी झाली पाहिजे, ती अनेक हातांनी जोपासली गेली पाहिजे आणि मगच परिवर्तनाचे वृक्ष फोफावते. संविधानिक मूल्यांची पेरणीही अशीच गुणाकार पद्धतीने वाढली पाहिजे. एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे, एका गावातून दुसऱ्या गावात, एका पिढीकडून पुढील पिढीकडे हा विचार पोहोचला पाहिजे. तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने समताधिष्ठित, प्रगत आणि विकसित राष्ट्र म्हणून उभा राहू शकेल. आज गरज आहे ती संविधानाला केवळ वाचनापुरते न ठेवता ते जगण्याची. संविधानातील मूल्ये आपल्या दैनंदिन आचरणात आणण्याची. कारण संविधान वाचणारे नागरिक अनेक असतात, पण संविधान जगणारे नागरिकच समाज बदलतात. संविधानिक मूल्यांच्या या प्रवासात योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ती आणि संस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन. तसेच अशा प्रेरणादायी उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा देणाऱ्या ई. झेड. खोब्रागडे सरांच्या कार्याला सलाम. ●●









अनिल केशव बारसागडे
मो. 9420510239

# खुल्या प्रवर्गात बंदी आरक्षण संपविण्याचा कट

२०१४ नंतर भाजपच्या सत्ताकाळात देशात प्रचंड बदल घडून आले. मोठ्या प्रमाणात श्रीमंताची श्रीमंती आणि गरिबांची गरीबी वाढली. राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेच्या पेपरफुटीमुळे तरुण वर्गात असंतोष निर्माण झाला. त्यातून, बेरोजगारीतून ‘सीजेपी’ म्हणजे ‘कॉकरोच जनता पार्टी’चा उदय झाला. सत्ताधारी मात्र या समस्यांवर ‘मन की बात’ सुद्धा करत नाहीत. ते कायम निवडणूक मोडमध्ये दिसतात. देशाच्या प्रधान सेवकाने देशवासीयांना सोने खरेदी करू नये, विदेशवाऱ्या करू नये, तेलाचा वापर कमी करावा असे सल्ले दिले आणि स्वतः मात्र विदेशवाऱ्यात मग्न असतात. भारतीय संविधानानुसार देश धर्मनिरपेक्ष आहे, पण ‘धर्म स्वातंत्र्य विधेयक 2026’ पास झाले. धर्म बदलण्यावर बंधने घालण्यात आली. धर्म बदलला तर जुलुमी शिक्षेचे प्रयोजन. अनुसूचित जाती जमातीमध्ये वितंडवाद निर्माण करण्यासाठी आणि बौद्धांचे आरक्षण संपविण्यास उपवर्गीकरणची योजना आणली. त्यांची मजल इतकी वाढली कि अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या राखीव प्रवर्गातील उमेदवारावर बंधने लादली. 14 मे 2026 रोजी महाराष्ट्र शासनाने तसा निर्णय घेतला. बहुजनांच्या उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर परिक्षा फी, शिष्यवृत्ती, वयोमर्यादा वा परिक्षेला बसण्याची संधी यांमध्ये सवलत घेतली असेल तर, त्याची खुल्या (ओपन कॅटेगरी) प्रवर्गात यापुढे निवडच होणार नाही. या सवलती देण्यामागच्या संवैधानिक उद्देशालाच केराची टोपली दाखवण्यात आली. या उलट 2019 साली केंद्र सरकारने (EWS)आर्थिकदृष्ट्या दुर्बल सवर्णांसाठी मागणी किंवा आंदोलन नसतांनाही, संविधानिक तरतुदींना डावलून संपूर्ण देशात 10 टक्के आरक्षण लागू केले. अशी विषारी व्यवस्था कार्यरत आहे. हजारो वर्षापासून शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण धोरणाचे औचित्य होते. भारतात वर्णव्यवस्थेच्या जाचामुळे निर्माण झालेली विषमता दूर करण्यासाठी आणि संधीच्या उपलब्धतेसाठी कायद्याने दिलेली सवलत होती. त्यामुळे आपल्या बुद्धिमत्तेच्या आधारावर उच्चवर्णीय उमेदवारापेक्षा जास्त गुण मिळविले असले तरी त्या उमेदवाराची केवळ सवलत घेतली म्हणून संधी नाकारणे हे संविधानातील संधीची समानता या तत्वाचे सरळ उल्लंघन होय. वास्तविक आजही जातीय भेदाभेद विविध स्वरुपात कायम आहे. त्यात बदल झाला नाही. एक टक्का असलेल्या उच्चवर्गीयांकडे 40 टक्के संसाधने असल्याचा अहवाल विषमता दर्शवितो. एका वर्गाकडे प्रचंड ताकद, सत्ता, पैसा आहे. दुसरीकडे सुमारे 80 कोटी आर्थिक दुर्बल घटक मोफत मिळणाऱ्या अन्नधान्यावर जगत आहे. या दुर्बल घटकातून प्रचंड मेहनत करून पुढे येणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर या मार्गाने बंधने लादली जात आहे. यात बौद्ध समाज जात्यात आहे तसा अन्य समाज सुद्धा सुपात आहे. संख्येने अत्यल्प असणाऱ्या उच्चवर्गीयांनी सर्व क्षेत्रात 80 ते 90 टक्के जागा पूर्वीपासून बळकावल्या आहेत. या तुलनेत एससी/एसटी/ओबीसी अर्थात बहुसंख्येने असलेल्या समाजाला 49.50 आरक्षण आहे. उर्वरित 50.50 टक्के जागेवर उच्चवर्गीय बसले आहेत. दुसऱ्या शब्दात देशातील 3 टक्के ब्राह्मण, बनिया 90 टक्के सत्ता व साधन संपत्तीवर कुंडली मारून बसले आहेत. ही विषमतेची दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. संविधानिक कायद्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी अनेक खटल्यात आरक्षित (SC/ST/OBC) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गात जाऊ शकतो असा निकाल दिला आहे. त्याची अंमलबजावणी राज्य सरकारांनी करावे असे मत न्यायालयाने नोंदविले आहे. परंतु पेशवा प्रणित राज्य सरकार ‘बहुजन हिताय-बहुजन सुखाय’ चा विचार करायला तयार नाही. सरकारात असलेले उच्चवर्णीय न्यायालयाच्या निर्णयालाही जुमानत नाहीत. त्यांनी खुल्या प्रवर्गात एससी-एसटी-ओबीसीना बंदी घातली व ५० टक्के जागा ३ टक्के उच्चवर्गीयांसाठी राखीव करून टाकल्या. राखीव प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवाराला यापुढे खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही असा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात निर्णय घेण्यात आला आहे. डॉ. नितीन राऊत म्हणतात, हा निर्णय म्हणजे बहुजन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रकार आहे. वास्तविक संवैधानिक तरतुदीप्रमाणे राखीव प्रवर्गातील एखादा उमेदवार स्वतःच्या गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातील गुण प्राप्त करत असेल तर त्याची निवड खुल्या प्रवर्गातून केली जाणे हा त्याचा घटनादत्त अधिकार आहे. परंतु केवळ वयोमर्यादा किंवा शुल्कातील सवलतीचे कारण पुढे करून त्या उमेदवाराला खुल्या प्रवर्गातून दूर करणे म्हणजे त्याच्या गुणवत्तेचा अपमान करणे होय असे खेदाने म्हणावे लागते. एकंदरीत सरकारच्या खुल्या प्रवर्गात बहुजनांच्या प्रवेशाचा मार्ग बंद करण्याच्या सरकारच्या धोरणाचा प्रत्येक सुजाण नागरिकांनी निषेध नोंदविला पाहिजे. उपवर्गीकरण, खुला प्रवर्गाची समस्यांच्या विरोधात निवेदने, आंदोलन, जनजागृती केला पाहिजे. सरकारचे हे निर्णय हाणून पाडले पाहिजे. संविधानातील तरतुदींना डावलून उच्चवर्णीय वर्गास ५० टक्के आरक्षण देणे, हा कुटील डाव आपण हाणून पाडला पाहिजे. सरकारच्या या धोरणाचा निषेध आहे. ●●






श्रीराम बनसोड,
8208617748




# साद घालतो कबीर

मागील गुरुवारी आपण गुरु कसा असतो हे पाहिले. मात्र सर्वच गुरुसारखे नसतात. बरेचदा गुरु म्हणविणारेच अज्ञानी असतात. अंधश्रद्धाळू, लोभी, द्वेष करणारे, अहंकारी इ. दुर्गुण गुरुमध्येच असतात. असे आंधळे गुरु जर जीवनात आले तर तो शिष्य सुद्धा तसाच होतो. कारण गुरुचे संस्कार शिष्यावर सतत होत असतात.

**‘जा का गुरु हैं आंधरा**
**चेला खरा निरंध**
**अंधे को अंधा मिला**
**पडा काल का फंद’**

ज्याचा गुरु आंधळा असेल तर त्याचा शिष्य महाआंधळाअसतो. आंधळ्याला आंधळा भेटला तर मार्ग कोण दाखविणार? आणि मग त्या दोघांचाही नाश झाल्याशिवाय राहत नाही.

म्हणून संत कबीर म्हणतात :-

**‘शिष किरपन गुरु स्वारथी**
**मिले योग यह हाय**
**कीच कीच के दाग को**
**कैसे सकै छुडाय’**

शिष्य कृपण म्हणजे क्षुद्र मनोवृत्तीचा आणि स्वार्थी गुरु जर एकमेकांना भेटले तर काय होईल? चिखलाला चिखल भेटला तर डाग कसे जातील? ●●



प्रा. वसंत वावरे
मो. 9403304670

# शिक्षणासाठी गांव सोडले

## शिवराम बगन भलावी

शिवराम बगन भलावी. एक उत्तुंग व्यक्तीमत्व, साधी राहणी, मितभाषी, मनमिळावू स्वभाव, गोंडी भाषेवर प्रभुत्व, संवादानंतर मिश्कली चेहऱ्यावरील हास्य. आदिवासी गरीब कुटुंबात जन्मलेला शिवराम भलावी भविष्यात आय. एस. एस पर्यंत मजल मारतो. ही प्रेरणा, बलस्थाने येणाऱ्या पिढीला चेतनारूपी उलगुलान निर्माण करणारे आहे. शिवराम भलावी एक अजिंक्य सूर्यतारा आहे. शेतकरी, शेतमजूर, वनूजूर ते आय. एफ. एस. हा खडतर प्रवास, जीवन संघर्षाची यशस्वी वाटचाल! चला तर ओळख करून घेऊया. शिवरामचा जन्म १ (एक) फेब्रुवारी १९६२ रोजी मानेगांव (कला) ता. रामटेक, जि. नागपूर येथे आदिवासी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण बी.एससी. कृषी, एम.पी.एस.सी. पास, आय सी ए आर ज्युनियर फेलोशिप, आय एफ एस I.F.S. २०१९ (भारतीय वनसेवा). वडील बगन भलावी आई कमलाबाई भलावी. शिवराम मोठा मुलगा. सुमित्रा, मंगला, सुनंदा अशा तीन बहिणी. सहाजणांचे कुटुंब. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक. शेती करणे हा वडीलांचा व्यवसाय. गावात शिक्षणाच्या सोयी सुविधा नव्हत्या. लहानश्या खेडेगावात शेतीवर कुटुंबाचा सांभाळ करणे म्हणजे तारेवरची कसरत होती. शेतात रात्रंदिवस आईबाबा कष्ट करायचे. संध्याकाळी घरी आईबाबा परत यायचे. त्याकाळी घरात वीज नव्हती. घरी दोन बैल होते. त्या जोडीवर शेतीचे काम अवलंबून होते. मी बैलांना चराईसाठी जंगलात जात होतो. बैलाची राखण व चटाई हे माझे बालपणचे काम. गावात एकच पूर्व माध्यमिक शाळा होती. शिक्षणाचा घरात गंध नव्हता. तरीपण माझे आईबाबा मुलगा (शिवराम) शाळेत जावून खूप मोठा व्हावे हे स्वप्न उराशी बाळगून होते. वडीलांना शिक्षणाविषयी आवड होती. गावात एकच शाळा होती. पूर्व माध्यमिक शाळा मानेगाव (कला) ता. हिवराबाजार येथे इयत्ता १ ते ७ पर्यंत शिकलो. लहानपणापासून शेतीच्या कामात घरी मदत करीत होतो. ज्या हातात लेखणी होती त्याच हातात शाळा संपल्यानंतर बैलांना चटाईचे काम करावे लागत होते. जेवढे घरी लक्ष होते तेवढेच लक्ष माझे शिक्षणाकडे होते. वीज नसल्याने मला घरी रॉकेलच्या दिव्यात अभ्यास करीत होतो. कितीतरी रात्री जागून पहाटेपर्यंत अभ्यास करीत राहीलो. मला परिस्थिती बदलावे लागेल म्हणून निर्धार केला. जीवतोड मेहनत करूनही आम्हाला दोन वेळचे पोटभर अन्न मिळत नव्हते ही खंत माझ्या मनात होती. अभ्यास व शाळा सांभाळून घरच्या परिस्थितीचा विचार करून शिक्षणाची वाट सोडली नाही. १९७३-७४ साली मी इयत्ता ७ वीला शिकत होतो. यावर्षी अन्नधान्याचा तुटवडा होता. स्वस्त धान्य दुकानात लाल ज्वारी म्हणजे मिलो उपलब्ध होते. भात जिभेला लागले नाही. मिलोच्या भाकरी आणि चटणी खाऊन रहायचो. लाचारी पत्करली नाही. अभ्यासात खंड पडू दिला नाही. पोटाच्या भुकेपेक्षा ज्ञानाची भूक हीच माझ्या भविष्याची शिदोरी आहे हे मी ओळखले. जिद्द, चिकाटी आणि परिश्रम करून स्वकर्तृत्वावर इयत्ता सातवीत ८७% गुण प्राप्त केले. क्रमशः ■ ■




आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

# पेपर फुटी, न्यायाची मागणी आणि विद्यार्थ्यांचे खचलेले मानसिक आरोग्य

जंतर मंतर वरील युवकांचे आंदोलन, देशात ७० वेळा झालेली पेपर फुटी आणि विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, या विषयावर आपण चर्चा करणार आहोत, ‘७० पेपर फुटी आणि एक पिढीचा राग : जंतर मंतर वर झालेले आंदोलन’ हे संपूर्ण देशाने पहिले. आजच्या काळात विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत आहे. एकीकडे कठोर मेहनत करून परीक्षांची तयारी करणारे लाखो तरुण, दुसरीकडे पेपर फुटी, रद्द परीक्षा आणि भ्रष्टाचार यामुळे त्यांचे स्वप्न भंग पावत आहेत. दिल्लीतील ऐतिहासिक जंतर मंतर वर जेनझी Gen Zi युवकांनी मोठ्या संख्येने आंदोलन केले आहे. यात पेपर लीक, शिक्षण व्यवस्थेतील गोंधळ आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या समस्या हे मुख्य मुद्दे आहेत. याच विषयावर हा लेख आहे. ‘जंतर मंतरवरील युवकांचे बंड : पेपर फुटी, न्यायाची मागणी आणि विद्यार्थ्यांचे खचलेले मानसिक आरोग्य’ या दृष्टीकोनातून जंतर मंतरवरील युवकांच्या आंदोलनाकडे आपण पाहणार आहोत. 6 जून २०२६ मध्ये दिल्लीच्या जंतर मंतरवर हजारो युवक आणि विद्यार्थी एकत्र आले. भारताचे विद्यमान ५३ वे सरन्यायाधीश (Chief Justice of India) हे न्यायमूर्ती सूर्यकांत आहेत. त्यांनी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे सर्वोच्च सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला. १५ मे रोजी एका सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायालयीन यंत्रणेवर चिखलफेक करणाऱ्या प्रवृत्तींवर कडक शब्दांत ताशेरे ओढले होते. दिल्ली उच्च न्यायालयातील ‘वरिष्ठ अधिवक्ता’ पदाच्या निकषांना आव्हान देणाऱ्या एका वकिलाची कानउघाडणी करताना सरन्यायाधीशांनी हे वक्तव्य केले होते. या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश म्हणाले होते की, “समाजात असे काही परजीवी आहेत जे सातत्याने व्यवस्थेवर हल्ले करत असतात. तुम्हाला त्यांच्याच पंगतीला जाऊन बसायचे आहे का? काही तरुण हे ‘कॉक्रोच’सारखे (झुरळ) असतात, ज्यांना कायद्याच्या क्षेत्रात किंवा इतर कुठेही काम मिळत नाही. मग असे लोक पत्रकारिता, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनतात आणि सर्वांवरच चिखलफेक करू लागतात.” सोशल मीडियावर ‘कॉकरोच जनता पार्टी’ची चर्चा सरन्यायाधीशांच्या या ‘कॉक्रोच’ शब्दाचा धागा पकडून लागलीच सुरु झाली. यावरून सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. मूळचे महाराष्ट्रातील हिंगोली या गावचे अभिजित दिपके सध्या यांचे आई वडील संभाजीनगर जुने औरंगाबाद येथे राहतात. पुणे येथे महाविद्यालईन शिक्षण घेऊन माध्यमांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी अमेरिका येथील बोष्टन या शहरांत घेत आहेत, सध्या अमेरिकेत राहणारे ३० वर्षीय अभिजित दिपके यांनी या वक्तव्याचा उपरोधिक निषेध म्हणून ‘कॉक्रोच जनता पार्टी’ नावाचे एक डिजिटल विचारपीठ सुरू केले. पाहता पाहता ही मोहीम इंटरनेटवर तुफान व्हायरल झाली. कॉकरोच जनता पार्टी (CJP) या सोशल मीडियावर निर्माण झालेल्या सारख्या संघटनांच्या नेतृत्वात हे शांततापूर्ण आंदोलन झाले. विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. का झाले हे आंदोलन? NEET-UG २०२६ परीक्षेत मोठी पेपरफुटी झाली. २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांवर परिणाम झाला. परीक्षा रद्द झाली, पुन्हा तयारी करावी लागली.

**CBSE च्या मूल्यमापन प्रक्रियेतही गोंधळ :** यापूर्वी UGC-NET सारख्या परीक्षाही रद्द झाल्या होत्या. विद्यार्थी, युवक, प्राध्यापक आणि सामान्य नागरिक यांनी भाग घेतला. “न्याय हवा, पारदर्शकता हवी”. ‘जय जय जय जय जयभीम’ अशा घोषणा देण्यात आल्या. अजूनही शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला नाही म्हणून आंदोलन अधिक तीव्र झाले. सोनम वांगचुकसारख्या व्यक्तींनीही समर्थन दिले. उपस्थिती दिली, हे आंदोलन फक्त एका परीक्षेचे नव्हते, तर संपूर्ण शिक्षण आणि नोकरी व्यवस्थेवरील राग व्यक्त करणारे होते. देशात ७० वेळा झालेली पेपर फुटी हे आंदोलन काही एका घटनेमुळे नव्हे तर सातत्याने होणाऱ्या पेपर फुटीमुळे उफाळले आहे. गेल्या ७-१० वर्षांत भारतात ७० हून अधिक पेपर लीक झाल्याचे रिपोर्ट आहेत. १५ हून अधिक राज्यांमध्ये हे घडले. सुमारे १.७ कोटी विद्यार्थी यामुळे प्रभावित झाले. NEET, JEE, UGC-NET, SSC, राज्य स्तरावरील भरती परीक्षा - कुठेही सुरक्षित नाही. २०२४ आणि २०२६ मध्ये NEET मधील फुटीमुळे मोठा गोंधळ झाला. एका ‘गेस पेपर’ मध्ये खऱ्या प्रश्नांशी जुळणारे १००+प्रश्न आढळले. पेपर लीक माफिया सक्रिय आहे. कोचिंग सेंटर, कर्मचारी, राजकीय संबंध यात गुंतलेले असल्याचे आरोप आहेत. परीक्षा रद्द होणे, पुन्हा परीक्षा घेणे, वेळ आणि पैशाची नासाडी - याचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसतो. वर्षानुवर्षे तयारी करणारे विद्यार्थी एका रात्रीत निराश होतात.

**विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य :-** पेपर फुटीचा सर्वात मोठा परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो.

**अधिक ताण-तणाव (Stress & Anxiety) :** वर्षभर रात्रंदिवस अभ्यास करणारे विद्यार्थी, जेव्हा पेपर फुटतो तेव्हा त्यांचे सारे प्रयत्न वाया जातात. पुन्हा तयारी करणे म्हणजे पुन्हा तेच तणाव.

**निराशा आणि डिप्रेशन :** “माझी मेहनत कशासाठी?” असा विचार मनात येतो. काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे दुर्दैवी घटनाही समोर आल्या.

**अन्यायाची भावना :** जे विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करतात, त्यांना वाटते की “पैसे आणि कनेक्शन असणारे जिंकतात”. कुटुंबातील अपेक्षा, कोचिंगचे महागडे फी, कर्ज - हे सर्व मिळून विद्यार्थ्यांना मानसिकदृष्ट्या खचवते. मानसिक आरोग्य तज्ञ सांगतात की, अशा घटनांमुळे आत्मविश्वास कमी होतो, झोप न लागणे, चिडचिड, एकटेपणा येतो. दीर्घकाळ टिकणारा ताण शारीरिक आजारही घेऊन येतो.

**काय करायला हवे?**

**कठोर कायदे :** पेपर लीक करणाऱ्यांना कठोर शिक्षा (जसे की फाशी किंवा दीर्घ मुदतीची शिक्षा).

**तंत्रज्ञानाचा वापर :** डिजिटल, कंप्यूटर-आधारित परीक्षा, बायोमेट्रिक, CCTV. **पारदर्शकता :** NTA सारख्या संस्थांची जबाबदारी निश्चित करणे, नियमित ऑडिट. **मानसिक मदत :** शाळा-कॉलेजमध्ये मानसिक आजारावरील उपचार, काउन्सेलिंग सेंटर, हेल्पलाइन.

**शिक्षण सुधारणा :** फक्त परीक्षांवर अवलंबून न राहता कौशल्य-आधारित शिक्षण. जंतर मंतरवरील युवकांचे आंदोलन हा केवळ राग नाही, तर भविष्याची मागणी आहे. पेपरफुटी ही फक्त एक परीक्षेची समस्या नाही, तर संपूर्ण पिढीच्या आशा-आकांक्षांशी संबंधित आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपणे हे सरकार, राज्य संस्था आणि समाजाचे कर्तव्य आहे. प्रामाणिक मेहनत करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला न्याय मिळाला पाहिजे. शिक्षण व्यवस्था मजबूत झाली तरच देश मजबूत होईल. युवकांच्या या आवाजाकडे दुर्लक्ष करणे सरकारला परवडणारे नाही. विद्यार्थी जागृत झाले तर बदल नक्की येईल! ●●

मन:स्वास्थ्याचा प्रवास



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933







# जंतरमंतरवर युवकांचे बंड

गुरूवार, ११ जुन 2026
Thursday, 11 June 2026

“ सत्याच्या मार्गावर चालणारे नेहमी विजय मिळवतात... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा निर्णायक प्रश्न
## मतपत्रिकेकडे पुनरागमन की ईव्हीएमवर विश्वास?

भारताच्या निवडणूक प्रक्रियेत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि मतदार पडताळणी यंत्रणा (व्हीव्हीपॅट) यांचा वापर गेल्या दोन दशकांपासून मोठ्या प्रमाणावर होत आहे. निवडणूक आयोगाच्या मते ही प्रणाली जलद, अचूक आणि पारदर्शक आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीनंतर ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित होताना दिसतात. अलीकडेच पंजाबमध्ये पुन्हा एकदा मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी काही राजकीय पक्ष आणि सामाजिक गटांकडून करण्यात आली. त्याच अनुषंगाने उत्तर प्रदेशातील २०२७ च्या विधानसभा निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात का, हा प्रश्न आता सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. कारण हा मुद्दा थेट लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी आणि मतदारांच्या मनातील निवडणूक प्रक्रियेबद्दलच्या विश्वासाशी संबंधित आहे. भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्रात निवडणुका म्हणजे जगातील सर्वात मोठा लोकशाही उत्सव. लाखो कर्मचारी, हजारो उमेदवार आणि कोट्यवधी मतदार या प्रक्रियेत सहभागी होतात. अशा परिस्थितीत मतपत्रिकेऐवजी ईव्हीएमचा वापर सुरू करण्यामागे अनेक व्यावहारिक कारणे होती. मतमोजणीतील विलंब, मोठ्या प्रमाणावर होणारे अवैध मतदान, मतपत्रिका लुटणे, बनावट मतदान आणि मतमोजणीतील मानवी चुका या समस्यांवर उपाय म्हणून ईव्हीएमचा स्वीकार करण्यात आला. खरे तर ईव्हीएममुळे निवडणूक निकाल काही तासांत जाहीर होऊ लागले. खर्चात बचत झाली. मतपत्रिकांच्या छपाईवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला. मतदान केंद्रांवरील व्यवस्थापन सुलभ झाले. त्यामुळे निवडणूक आयोग ईव्हीएम प्रणालीचे सातत्याने समर्थन करत आला आहे.

परंतु दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक राजकीय पक्ष, निवृत्त प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञान क्षेत्रातील काही तज्ज्ञ आणि नागरिक संघटना ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करत आहेत. त्यांचा मुख्य युक्तिवाद असा आहे की कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रणाली शंभर टक्के त्रुटीमुक्त असू शकत नाही. यंत्रामध्ये फेरफार झाला नाही याची खात्री जनतेला कशी मिळणार? निवडणुकीतील पराभवानंतर अनेक पक्षांनी ईव्हीएमवर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या काळात अशा शंका व्यक्त केल्या आहेत. याच ठिकाणी प्रश्न फक्त ईव्हीएमचा राहत नाही तर तो लोकशाहीतील विश्वासाचा बनतो. एखादी निवडणूक निष्पक्ष झाली असली तरी जनतेच्या मनात संशय निर्माण झाला तर लोकशाही कमकुवत होते. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास हा निकालापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो. मतपत्रिकेच्या समर्थनार्थ बोलणाऱ्यांचे म्हणणे आहे की कागदी मतपत्रिका हा सर्वसामान्य नागरिकाला सहज समजणारा आणि पडताळता येणारा पर्याय आहे. मतदाराने दिलेले मत प्रत्यक्ष कागदावर नोंदवले जाते. आवश्यक असल्यास पुन्हा मोजणी करता येते. त्यामुळे पारदर्शकता वाढते. जगातील अनेक विकसित देश आजही कागदी मतपत्रिकांचा वापर करतात, हेही या गटाचे प्रमुख म्हणणे आहे. मात्र मतपत्रिका प्रणालीही निर्दोष नव्हती. भारताने अनेक दशकांपर्यंत मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या आणि त्या




काळात बूथ कॅप्चरिंग, मतपेट्या पळविणे, खोट्या मतांची भर घालणे आणि मतमोजणीतील वाद यासारख्या गंभीर समस्या वारंवार समोर आल्या. अनेक ठिकाणी निवडणूक निकालांसाठी अनेक दिवस प्रतिक्षा करावी लागत असे. त्यामुळे फक्त मतपत्रिका आली म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असेही म्हणता येणार नाही. यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मतदारांच्या शंका दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल? लोकशाहीत जनतेचा विश्वास सर्वोच्च असतो. जर मोठा वर्ग ईव्हीएमबद्दल प्रश्न विचारत असेल तर त्यांना "तुमच्या शंका चुकीच्या आहेत" असे म्हणून गप्प बसवणे योग्य नाही. उलट अधिक पारदर्शकता, अधिक पडताळणी आणि अधिक सार्वजनिक सहभाग यावर भर दिला पाहिजे. आज व्हीव्हीपॅट प्रणाली अस्तित्वात आहे. मतदाराने दिलेले मत काही सेकंदांसाठी स्क्रीनवर दिसते आणि त्याची कागदी नोंदही तयार होते. परंतु प्रत्यक्षात सर्व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी केली जात नाही. त्यामुळे अनेकांचे समाधान होत नाही. जर निवडणूक आयोगाने व्हीव्हीपॅट पडताळणीचे प्रमाण वाढवले किंवा विशिष्ट परिस्थितीत सर्व मतांची कागदी पडताळणी करण्याची यंत्रणा विकसित केली, तर अनेक शंका दूर होऊ शकतात.

उत्तर प्रदेशासारख्या विशाल राज्यात २०२७ मध्ये मतपत्रिकेवर निवडणूक घेणे हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही तर तो आर्थिक, प्रशासकीय आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित आहे. कोट्यवधी मतपत्रिका छापणे, त्यांचे वितरण, सुरक्षित साठवणूक, मतमोजणी आणि निकाल प्रक्रिया यासाठी प्रचंड मनुष्यबळ व खर्च लागेल. त्यामुळे मतपत्रिकेच्या बाजूने बोलणाऱ्यांनी या व्यावहारिक बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. दुसरीकडे ईव्हीएम समर्थकांनीही जनतेच्या प्रश्नांना अहंकारी पद्धतीने नाकारण्याऐवजी त्यांची उत्तरे देण्याची तयारी दाखवली पाहिजे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे.



प्रविण बागडे
9923620919

निवडणूक आयोग, तंत्रज्ञ आणि राजकीय पक्ष यांनी एकत्र येऊन अधिक विश्वासार्ह आणि सर्वमान्य प्रणाली निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज गरज आहे ती ईव्हीएम विरुद्ध मतपत्रिका या संघर्षाची नाही, तर निष्पक्ष आणि सर्वमान्य निवडणूक प्रक्रियेची. कोणतीही प्रणाली अंतिम सत्य नसते. काळानुसार सुधारणा कराव्या लागतात. जर जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मतपत्रिका, व्हीव्हीपॅट किंवा अन्य कोणती तांत्रिक सुधारणा आवश्यक असेल, तर त्यावर खुली चर्चा होणे आवश्यक आहे. लोकशाही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही तर ती विश्वासाने जिवंत राहते. मतदाराला आपल्या मताचा सन्मान होत असल्याची खात्री वाटली पाहिजे. निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागतो हा दुय्यम मुद्दा आहे, परंतु निकाल कसा लागला याबद्दल सर्वांना समाधान असणे हा प्राथमिक मुद्दा आहे. २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात मतपत्रिकेवर मतदान व्हावे की ईव्हीएमवर, याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग आणि कायदे करणाऱ्या संस्थांना घ्यायचा आहे. मात्र या चर्चेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, भारतीय मतदार आता अधिक सजग झाला आहे. तो फक्त मतदान करत नाही, तर मतदान प्रक्रियेबाबतही प्रश्न विचारत आहे. आणि प्रश्न विचारणारा नागरिक हीच सशक्त लोकशाहीची खरी ओळख आहे.●●

## बुनियाद

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जर कुणी तुम्हाला त्याचे दुःख, वेदना किंवा त्रासाबद्दल सांगत असेल तर कृपया त्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकुन घ्या. त्याच्याशी त्या क्षणाला सौजन्याने वागा . कारण तुम्ही जरी त्याचे म्हणणे ऐकत असले तरी समोरच्या व्यक्तीला तुमच्या वर्तनातून नेमकी तुमची भूमिका काय हे जाणवते. असं म्हणतात 'बातों से ज़्यादा बर्ताव चुभता है. हालात चाहे जैसे भी हो, शुक्र हमेशा शिकवे से बेहतर होता है 'म्हणून ह्या कठीण काळात आपल्या वागण्या बोलण्यावर खूप अवलंबुन असते. समोरची व्यक्ती तुमच्यावर असलेल्या विश्वासामुळे तुमच्याजवळ आपल्या मनाचे भाव व्यक्त करीत असते. विश्वासाने सांगितलेल्या गोष्टी ह्या दोघांमध्येच रहाव्या अशी समोरच्या व्यक्तीची अपेक्षा असते. नाहीतर त्याचेवर हे म्हणण्याची वेळ आणू नका. ' राज कैसे पहुँच गए ग़ैरों तक ? मशवरे तो हमने अपनों से किए थे ' एखाद्याच्या विश्वासघातामुळे होता त्यापेक्षाही जास्त त्रास जर काही मनातल्या गोष्टी सांगितल्याने होत असेल तर समोरची व्यक्ती निमुटपणे सर्व सहन करते कारण त्याला हे माहीत असते की, ' सब्र में वो ताकत है, जो वक्त आने पर सतानेवालों की बुनियाद तक हिला सकता है 'म्हणूनच कुणाच्या संयमाचा अंत पाहू नका. याऊलट हतबल , सज्जन आणि सहनशील व्यक्ती बिचारी व्यथित होऊन हेच म्हणेल की. ' अब ना कोई शिकवा , ना गिला ना कोई मलाल रहा, सितम उनके भी बेमिसाल रहे, सब्र अपना भी कमाल रहा.●●

# डोक्यातला भिम क्रांतीचा वणवा पेटवतो...

आंबेडकरी गायक कव्वाल यामध्ये अग्रेसर नाव म्हणजे राजानंद गडपायले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, कार्य चळवळ, त्यांना जवळुन पाहता आले. त्यामुळे त्यांनी तरुण वयातच भिमगाणी लिहायला सुरवात केली. त्यावेळी मुंबईत तीन गायन पाट्र्या होत्या. श्रीधर ओव्हळ यांची 'श्रीधर गायन पार्टी' वामनदादा कर्डक यांची 'राजकमल गायन पार्टी' राजानंद गडपायले यांची 'राजानंद गायन पार्टी' तर श्रीधर गायन पार्टीचे गायक गोविंद म्हशिलकर, राजकमल गायन पार्टीचे गायक 'श्रावण यंशवते'. त्या काळात या गायन पाट्र्यांना फारसा पैसा मिळत नसे. घरच्या भाकरी खावून लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यासारखे काम होते. जंगली फुलाचा वितभर हार, नारळ व सव्वा रुपया मिळायचा. तरी त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी तडजोड करायची नाही, हे ब्रिद त्यांनी जीवनभर पाळले. गीतकारामध्ये वामनदादा कर्डक दारिद्र्याचे घोट पचवित संपूर्ण महाराष्ट्र कधी बैलगाडीने, किंवा पायी फिरुन पिंजून काढत. वयाच्या 84 व्या वर्षी मरणाच्या शेवटच्यावेळी वामनदादा म्हणतात, 'राजकीय बलुतेदारी करणाऱ्या नेत्यांना धडा शिकवा. नेत्यांना समाजाची नव्हे तर स्वतःचीच चिंता असते. त्यांच्यात स्वार्थ एवढा भरला की मागे वळून पाहत नाही. गायक कव्वालांनी गावागावात जाऊन समाजाच्या एकतेचे गोडवे गायले पाहीजे.' आपल्या गीताच्या माध्यमातून खेड्यापाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार पोहचवला पाहिजे, राजानंद गडपायले असो की वामनदादा कर्डक यांनी संपूर्ण आयुष्य आंबेडकरी चळवळीला वाहुन घेतले. म्हणून आज लोकांच्या मनात आपले स्थान कायम पक्के करुन गेले. आज वामनदादा सारखा ताठर बाणा आजच्या कव्वाल गायकाकडे राहीला नाही. (काही अपवाद) आजचे कव्वाल गायक हे नाचे झाले आहे. नर्तकीसारखे स्टेजवर नाचतात कव्वालीही बसुन गाण्याचा प्रकार आहे. वामनदादा कर्डक, राजानंद गडपायले, नागोराव पाटणकर, गोविंद म्हशिलकर, श्रावण यशवंते, यांनी कव्वाली ही बसुन गायली, आता कव्वाल माकडउड्या मारतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत बुद्ध यांच्या फोटोंना हार टाकून वंदन गीत म्हणायचे व नंतर स्टेजवर नंगा नाच करायचा हे गायक कव्वाल लोकांचे न शोभणारे कृत्य आहे, असा नंगा नाच करायचा असेल तर स्टेजवर डॉ. बाबासाहेब - बुद्ध यांचे फोटो काढा व मग तुमचे अश्लील गाणे, अश्लिल हावभाव, असंविधानिक शब्दाचा भडीमार जोरात सुरू राहू द्या. परंतु इतिहास तुमची नोंद घेणार नाही याचीसुद्धा जाणीव असु द्या. आज कव्वाली बघा डामरट पोट्टे गीतकार झालेत. आपला भाव वाढावा म्हणून मुलींना स्टेजवर मास लावुन बोलवतात व ती आय लव यु चा चार्ट हातात घेऊन उभी राहते. हा कव्वालीचा आजचा स्तर आहे. एक कव्वाली तर मी अशी पाहीली, सोनारच स्टेजवर आला व त्याने गीतकाराच्या बोटात सोन्याची अंगठी टाकली. एवढे त्याला गीत आवडले. नंतर माहित झाले, त्या सोनाराकडे ती अंगठी बनवण्यात आली होती. अशी हलक्या दर्जाची कामे आजचे गीतकार प्रसिद्धीसाठी करत आहे आणि हा बह्याड समाज माझ्यासहीत यांना डोक्यावर घेऊन नाचत आहे. अश्या प्रवृत्तीने समता पर्व(यवतमाळ) सुद्धा सोडले नाही. आर्यन भट नावाच्या गायकाला बोलावून त्याला एक लाख रुपये गायनाचे दिले व आयोजकाकडून चार लाख रुपये घेतले व तीन लाख समाजाला मुर्ख बनवून लुबाडले. इतक्या खालच्या स्तराला आंबेडकरी कव्वाली पोहचली आहे. सर्व आदर्शांना बाजारात बसवण्याचा हा धंदा समाजातील काही अडाणचोट माणसाच्या संगनमताने सुरू आहे. दर्ग्यात बसुन गंजेटी कव्वालाचे रॅकेट निर्माण झाले आहे. असे कव्वाल आंबेडकरी शिक्षित माणसाचे प्रबोधन करत आहे. ज्यांनी मुसलमानांचे प्रबोधन करायला पाहिजे ती लोक आंबेडकरी माणसाचे प्रबोधन करतात, समाजाची मती मारल्या गेली आहे. वामनदादा शाळेची पायरी कधी चढले नाही, अण्णा



## आंबेडकरी कव्वाली

भाऊ साठेप्रमाणेच ते लोकविद्यापीठात शिकले, त्यांना प्रबोधनाचे बारकावे समजले आणि तुम्हाला मुसलमान ज्ञान देतो. हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पराभव आहे. तुम्ही त्यांना ज्ञान देण्याचे लायक आहात हे विसरले, तुमच्या समाजातील पैसा इतरत्र लुटल्या जात आहे आणि जो तो येतो आपलेच प्रबोधन करतो. जर मोमीनपुऱ्यात मुसलमानमध्ये आता गाताना आंबेडकरी कव्वाल दिसला पाहिजे. याला मग आपण म्हणू बदल, असे होत नाही. तुम्हाला ते जवळ करत नाही, तुम्ही मात्र गंजेटी कव्वालासोबत मांडीला मांडी लावून बसता हेच तुमच्या पतनाचे कारण आहे. कीर्तन, त्यांचे स्टेटज, आपला पैसा, आपला गायक - वादक, सर्व त्यांचे प्रबोधन फक्त आपले, ज्यांचे प्रबोधन करायचे आहे ते त्यांना वस्तीत काय मंदीरात बोलवत नाही व आपण जो ही आला डोक्यावर घेऊन नाचतो. त्यामुळे ते तिकडे जाऊन म्हणतात, जोरांन जयभीम म्हणायचे आहे. सर्व माल सन्मान अंदर एवढे हे मुर्ख आहेत.

ही लोक असे नाव ठेवतात. एखाद्या गीतकारांची थोरवी त्याच्या गीत वैपुल्यावर अवलंबून नसते, त्याची ही समृद्धी टिकवणे लेखणीची धार व गुणवत्ता बराच काळ टिकवून ठेवणे हीसुद्धा मोठी कामगिरी असते. 'काहीही गायन करायचे व समोर बाउंसर ठेवुन खपवून घ्यायच' व झिपऱ्या हालवत-हालवत अतिशय खालच्या दर्जाचे लिखाण लोकांकडून वदवून घ्यायचे, चांगला श्रोता हे खपवून घेणार नाही याची जाण असायला पाहिजे. आंबेडकरी कव्वालीमध्ये गुरु-शिष्याची परंपरा आहे. शिंदेशाही परंपरा, नागनाथाची परंपरा, भारती परंपरा अश्या टोपण नावाने सुद्धा कव्वाली गायल्या जाते. या परंपरेतच गायकांनी आपले आपले खुराटे बांधले व कव्वालांना मुक्त संचार करणे बंद केले. आज आपणास त्याचाच परिणाम दिसतो. विषाचे झाड आपणच लावायचे व आपणच त्याला कापण्यासाठी समोर यायचे असा हा मांग गारोड्याचा खेळ सुरू आहे. सर्वच चित्र निराशाजनक नाही तर आजही समाजात अनेक गितकार प्रबोधनकार कला साहित्य संघाच्यावतीने कव्वाल गायकांना एकत्र करुन आशावाद निर्माण करण्याचे कार्य करतात. मोरेश्वर सहारे यांच्यासारखा गितकार प्रामाणिकपणे आपले कार्य चोख बजावत आहे. निदान अश्या लोकांबरोबर राहुन कव्वालांनी आपली मोट बांधली पाहिजे. सत्यपाल महाराज महिन्याला एक बैठक घेतो व त्यांनी जे शिष्य तयार केले त्यांची विचारपूस करतो. त्यांना बरोबर कार्यक्रम भेटतात का? याकडे जास्त लक्ष देतो व आपल्या शिष्यांना आंबेडकरी समाजात कार्यक्रम मिळवून देतो. मग आपणही हा आदर्श का घेवू नये? अपघातात रक्तबंबाळ झालेला कवी उत्तम मुळे बेलदार समाजाचा राहूनही 'बुद्ध की धरती युद्ध न चाहे अमन परस्ती' यासारखे गीत लिहुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराशी प्रमाणिक राहतो. सुरेश भट नावाचा ब्राम्हण गझलकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर गीत लिहुन त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो, नामांतराच्या लॉंग मार्चमध्ये लोकांच्या मनात क्रांतीचे गीत गाऊन कवी इ. मो. नारनवरेसर लढण्याची प्रेरणा देतात. प्रतापसिंह बोदडे, लक्ष्मण केदारे, हरेनदूर जाधव, दलितानंद श्रीधर, शाहीर हेगडे, भास्कर, राजगुरू लक्ष्मण यांच्या गीतांनी आंबेडकरी समाजाचा सांस्कृतिक प्रांत समृद्ध केला. तत्सम आजचे गीतकार गायक असो त्यांनी यांच्या पावलावर पाऊल टाकून पुढचे ध्येय गाठले पाहिजे. खेड्यापाड्यात राहणाऱ्या अज्ञानी लोकांपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुस्तके पोहोचू शकत नाही. तिथे त्यांची मस्तके घडविण्याचे काम या मर्द गायक कवी कव्वालानी केले आहे. आज आंबेडकरी लोककलेच्या संदर्भात चिंतन करण्याची गरज आहे. बोटात रक्त येईपर्यंत बँजो वाजवणारा माणुस छाती दुखतपर्यंत ढोल, तबला वाजवणारा कलाकार आपले कलेशी प्रामाणिक राहतो, परंतु आपण गायक म्हणून त्यांना बंधवा मजदूर म्हणून व्यवहार करता तेव्हा मात्र दुःख होते. गायक गीतकार एकत्र येवूनच. हे आपले अण्णासारख प्रदूषण आपणच दुर करु शकतो. शेतकरी शेतमजूर, मजुरी करणारा मजुर आपल्या घामाच्या मेहनतीचा पैसा सार्वजनिक कार्यासाठी देत असतो. कव्वालीसारखे मनोरंजनाचे, प्रबोधनाचे गायन त्यांच्या आवडीचे असते. धार्मिक, सांस्कृतिक मंडळ विश्वासाने कार्यक्रम ठेवतात. परंतु त्यांना कळतच नाही मध्यस्थीने आपली फसवणूक केली. 50 हजाराचा कार्यक्रम एक लाखावर जातो व तिथे कार्यक्रम रद्द करण्याच्या धमक्या आयोजकांना दिल्या जातात, असले प्रकार आज या लोककलेत सुरु आहे. हे सर्व थांबले पाहिजे. कव्वालानी पायाला भिंगरी बाधुंन समोर आले पाहिजे, ही घाण दुर करून विषमतेच्या कंत्राटदाराविरुद्ध संघर्षाचे मोहळ उठविले पाहिजे. मोहळानेच आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीला नवे परिणाम दिले. या पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचारांचे ओझे पाठीवर घेऊन परिवर्तनाच्या या संगरात गाव गांव फिरुन तबला, ढोल ताश्याच्या गजरात भीमाचा आवाज बुलंद करु चला, मग नव्या वाटा, नव्या दिशा निर्माण करु... वामन दादा म्हणतात.. 'अन्यायाची चिरा चांबडी, चिरा करा चिधंड्या । चिरा करा चिंधड्या नाही तर भरा हाती बांगड्या..●●



प्रवीण कांबळे
मो. 9545499931

# मानवयुगाचे जगतगुरू बुद्ध आणि प्रबुद्ध
## भारताची वैचारिक परंपरा

**मानवाच्या इतिहासात गौतम बुद्ध यांचे स्थान अद्वितीय आहे. जगभरातील अनेक अभ्यासक, तत्त्वज्ञ, समाजसुधारक आणि विचारवंत बुद्धांना मानवजातीचे पहिले वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे मार्गदर्शक मानतात. बुद्धांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व आणि अवैज्ञानिक विचारांना नाकारून तर्क, विवेक, करुणा, मैत्री, समता आणि मानवकल्याण यांचा मार्ग समाजासमोर ठेवला.**



बुद्धांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणतीही गोष्ट केवळ श्रद्धेवर स्वीकारण्याचा आग्रह धरला नाही. उलट त्यांनी प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विवेकबुद्धीने विचार करण्याचा संदेश दिला. 'जे सत्य, तर्कसंगत आणि मानवकल्याणकारी आहे तेच स्वीकारा,' हा त्यांचा मूलभूत संदेश होता. त्यामुळे बुद्धांचा धम्म हा श्रद्धेपेक्षा प्रज्ञेचा, अंधविश्वासापेक्षा विज्ञानाचा आणि भेदभावापेक्षा समतेचा मार्ग मानला जातो. इतिहासाच्या विविध टप्प्यांवर भारतातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घडामोडींविषयी अनेक भिन्न मते मांडली गेली आहेत. काही विचारवंतांच्या मते प्राचीन भारतातील बौद्ध परंपरा आणि समतावादी संस्कृती यांचे नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर रूपांतर झाले. अनेक बौद्ध स्थळे, प्रतिके आणि विचारप्रवाह यांच्यावर इतर धार्मिक व सांस्कृतिक प्रभाव पडले. या विषयावर इतिहासकारांमध्ये मतभेद असले तरी बौद्ध संस्कृतीचा भारतीय इतिहासावर असलेला प्रभाव निर्विवाद आहे. सम्राट अशोक यांनी बुद्धांच्या धम्मावर आधारित प्रशासन आणि नैतिक मूल्यांचा प्रसार भारतासह आशियातील अनेक भागांत केला. अहिंसा, लोककल्याण, न्याय आणि नैतिक शासन यांचा त्यांनी पुरस्कार केला. त्यामुळेच आजही सम्राट अशोक आणि त्यांचे धम्मचक्र भारतीय राष्ट्रजीवनाचे प्रेरणास्थान मानले जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही बुद्धांच्या समतावादी आणि मानवतावादी तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये राष्ट्राच्या केंद्रस्थानी आणली. डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे धम्मदीक्षा घेऊन लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा दिली. भारतीय राष्ट्रध्वजातील अशोकचक्र, राष्ट्रपती भवनातील बुद्धमूर्ती तसेच देशाच्या अनेक राष्ट्रीय प्रतिकांमध्ये बौद्ध विचारांचा प्रभाव दिसून येतो. यामुळे बुद्धांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक मर्यादेत न राहता राष्ट्रीय आणि वैश्विक मूल्यव्यवस्थेचा भाग बनले आहे. आजच्या विज्ञानयुगात बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा, अंधश्रद्धेऐवजी विवेक, असमानतेऐवजी समता आणि स्वार्थाऐवजी मानवकल्याण यांचा संदेश बुद्धांनी दिला. म्हणूनच जगभरातील कोट्यवधी लोक बुद्धांना 'जगतगुरू' म्हणून मान्यता देतात. समाजात शांती, बंधुता आणि प्रगती निर्माण करायची असेल तर बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मानवी मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. प्रज्ञा, शील आणि करुणा या त्रिसूत्रीवर आधारित जीवनपद्धतीच मानवतेच्या उज्ज्वल भवितव्याचा मार्ग ठरू शकते.●●



अनिरुद्ध शेवाळे
9823368332

**मी एक शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्याच्या वेदना, त्याचा चालत असलेला संघर्ष आणि दु:खी जीवन मला जवळून ओळखता येते म्हणून आजपर्यंत शेतकऱ्यांवर मी अनेक लेख लिहिली आहे. भारत देश हा होऊन गेलेल्या थोर संतांचा, महापुरुषांचा, क्रांतीवीरांचा तसेच देशभक्तांचा देश आहे. सोबतच शेतकऱ्यांचा सुद्धा देश आहे. म्हणूनच या देशाला 'कृषीप्रधान' देश म्हणून ओळखल्या जातो.**

# बळीराजा आणि त्याचा हक्क !

महापुरुषांच्या काळात शेतकऱ्यांवर कोणतेही अन्याय होत नव्हते. कारण त्याच्या पाठीशी ते होऊन गेलेले महापुरुष उभे होते पण, आजकाल मात्र एवढे बदलेले चित्र बघायला मिळत आहे की, प्रत्येक ठिकाणी बळीराजाच भरडल्या जात आहे हे कोणापासूनही लपलेले नाही. त्याचे जगणे बघून जीव तुटतो. बळीराजा एवढा श्रीमंत नाही की, तो विमानाने प्रवास करेल. तो एवढा व्यापारी नाही की त्याचे मुले विदेशात शिकतील, तो एवढा धनाशेठ नाही की, त्याच्या बंगल्यात लक्ष्मी पाणी भरेल, तो माझा बळीराजा रात्रंदिवस कष्ट करून स्वतः उपाशी पोटी झोपतो, मात्र जगाला पोसत असतो. आज त्याच पोशिंद्याची जमीन इतरांच्या सुखासाठी, सुविधांसाठी हिसकावून घेतली जात आहे. त्याचा हक्क हिसकावून घेतले जात आहे ही किती मोठी शोकांतिका आहे. लोक म्हणतात की, सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. पण, बळीराजाचा हक्क हिसकावताना जीव तुटत नाही का? आज एवढ्या भर उन्हात जगाला पोसणारा बळीराजा आपली बैलगाडी, संपूर्ण कुटुंब धरून आंदोलन करायला घराबाहेर पडला आहे हे त्यांचे संघर्षमय जीवन बघून होऊन गेलेले महाविभूती किती दुःखी झाले असतील? विकासाच्या नावाखाली प्रत्येकवेळी बळीराजाचाच बळी घेतला जात आहे. गडचिरोली जिल्ह्यात बळीराजाची हजारो हेक्टर सुपीक जमीन विमानतळ आणि MIDC प्रकल्पासाठी हिसकावून घेण्याचा प्रयत्न दिसत आहे हे खूप निंदनीय प्रकार आहे. विकासाच्या नावाखाली नेहमी बळीराजाच का म्हणून भरडला जातो? जर विकासच करायचे असेल तर आधी बळीराजाचा विकास करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यायला पाहिजे. पण, तसे न करता उलट त्याच्या हजारो हेक्टर जमीनीवर हक्क गाजवून जिल्ह्याचा विकास करण्याचा प्रयत्न असेल तर तो विकास कोणत्या कामाचा? आधीच कितीतरी जंगलतोड झाल्यामुळे जिल्ह्यात पाण्याची टंचाई भासत आहे आणि आता विमानतळ बनविण्यासाठी बळीराजाचा हक्क हिसकावून घेतला जात आहे. बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे. कोणाचा नौकर, चाकर नाही. जर त्याचा विकास करायचा नसेल तर त्याच्या जमीनीवर हक्क गाजविण्याचा कोणालाही अधिकार नाही. बळीराजावर जेव्हा-जेव्हा संकटे येतात, त्याच्या मालाला पाहिजे तेवढा भाव मिळत नाही, गारपीटीने पीक मातीमोल होत असते, सारे पीक पुरात वाहून जाते तेव्हा त्याचा संघर्ष दिसत नाही का? डोळे असून आंधळे होतात, कान असून बहिरे होतात, तोंड असून मुके होतात, तो जगत कसा असेल त्याची कोणालाच काळजी नसते. जेथे, तेथे त्याला लुटमार करण्यासाठी टपून बसलेले असतात आणि आज एवढ्याने समाधान झाले नाही तर त्याच्या जमीनीवर हक्क गाजवताना बघून माणूसकीवरचा विश्वास उडून गेला आहे. कोण आहे या बळीराजाचा वाली? शोधून कुठे सापडेल का? शहरात झपाट्याने विकास होतो. प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा विकास होतो, सर्वांना मदत मिळते. मात्र बळीराजाची तळमळ, संघर्ष, कष्ट त्याची आंबील, चटणी कोणाला दिसत नाही. फक्त त्याच्यावर अन्याय केला जात आहे, समजुन, उमजून त्याच्याकडे पाठ फिरवली जात आहे आणि आता मात्र एवढे करून समाधान न झाल्याने त्याला भूमीहीन करण्याचा प्रयत्न दिसत आहे. पण, आता हे पुरे झाले. आता बळीराजा पूर्णपणे जागलाच पाहिजे आपली एकता जगाला दाखवायलाच पाहिजे. कारण तो पोशिंदा आहे लाचार नाही. तो महापुरुषांचा या भारतमातेचा लेकरू आहे. तो आता मागे राहणार नाही. एवढे वर्ष होऊन सुद्धा त्याचा विकास होत नाही. दरवर्षी कितीतरी शेतकरी आत्महत्या करतात तरीही शासनाला दिसत नाही आणि आज या गडचिरोली जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली फक्त आणि फक्त बळीराजाचा हक्क हिसकावून घेत आहेत हे, फार विचार करायला लावणारी बाब आहे. एवढ्या रखरखत्या उन्हात आपला हक्क वाचविण्यासाठी बळीराजा पायी चालत निघाला आहे. खरेच त्याला न्याय मिळेल का, की नाही हेच आता बघायचे राहिले आहे. प्रत्येकांनी या बळीराजाला साथ दिली पाहिजे. जर जिल्ह्याचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर अनेक वाटा आहेत. पण दुसरी वाट न पकडता पोशिंद्याला जमीनदोस्त करण्यासाठी भिडताना दिसत आहेत. गडचिरोली जिल्ह्याचा शासनाला विकास करायचा असेल तर योग्य तो मार्ग निवडावा. पण, बळीराजाचा हक्क हिसकावून घेऊ नये. कारण तो जगाचा पोशिंदा आहे. तोच नाही जगला तर पोसणारा कोणी उरणार नाही, पैसे कितीही असतील तरी ते पैसे खाऊन जगू शकत नाही. कारण जीवन जगण्यासाठी अन्नाची गरज असते. त्या अन्नदाता बळीराजाला जिवंतपणी मारू नका.●●



संगीता संतोष ठलाल
7821816485



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १७३

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा अहिल्यानगर



अहिल्यानगर येथील मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सध्याचा पुतळा हा भारतीय संसद भवनासमोरील पुतळ्याची हुबेहूब प्रतिकृती आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मनपाद्वारे हा पूर्णाकृती पुतळा साकारण्यात आला, तो २५ फुटी चौथऱ्यावर १० फूट उंचीचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या इतिहासातील प्रमुख टप्पे पुतळ्याची निर्मिती सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरातील पुतळ्याच्या धर्तीवर हा १० फुटी पूर्णाकृती पुतळा पुणे येथील शिल्पकार नवीन शेगमवार यांनी घडवला आहे पुतळ्यामध्ये बाबासाहेबांच्या हातात संविधानाची प्रत आहे. खर्च व रचना हा संपूर्ण प्रकल्प सुमारे ७२ लाख रुपये खर्चाचा आहे. अनेक वर्षांच्या न्यायालयीन आणि आंदोलनात्मक संघर्षानंतर, अखेर २७ जुलै २०२५ रोजी या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

संवाद मित्र गौरव आळणे

## महत्वाचे

### बसपाचे बिरसा मुंडांना अभिवादन




**नागपूर :** क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या 126 व्या शहीद स्मृतिदिन निमित्त बहुजन समाज पार्टीच्या वतीने फुटाळा तलाव परिसरात असलेल्या बिरसा मुंडा यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला आदिवासी समाजाचे बसपा नेते ॲड. वीरेश वरखडे, मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, बबीता डोंगरवार यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले. जल जमीन व जंगलच्या रक्षणासाठी इंग्रज सरकार विरुद्ध स्वतःच्या प्राणाची आहुती बिरसा मुंडा यांनी दिली. आता केंद्र सरकार द्वारे महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेशातील 3,240 हेक्टर वनजमीन अदानी समूहाला देण्यात आली, अंदमान निकोबार बेट जे भारतातील अतिसंवेदनशील असून जिथे आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात राहतात तेथील 13,000 हेक्टर पेक्षा जास्त वनक्षेत्र अदानीच्या बंदर, विमानतळ, वीज प्रकल्पसाठी केंद्र सरकारने देण्याचे मंजूर करून आदिवासींना वनवासी बनवण्याचे षडयंत्र रचले, केंद्र सरकारच्या या अमानवी नीतीचा बसपा नेते उत्तम शेवडे यांनी बिरसा मुंडा स्मृतिदिनी निषेध केला.

'कही हम भूल ना जाये' या बसपाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या अभिवादन समारोहाचे प्रास्ताविक अंकित थूल यांनी, संचालन अभिलेश वाहाने यांनी तर समारोप सौरभ जामगडे यांनी केला. कार्यक्रमाला रमा इंगळे, सदानंद जामगडे, वीरेंद्र कापसे, जनार्धन मेंढे, संगीतबाबू इंगळे, भास्कर कांबळे, आस्था शेवडे, मनोज गजभिये आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

### अस्मिता बुद्ध विहार परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात




**नागपूर :** नागपूर महानगरपालिका आणि अस्मिता बुद्ध विहार, अस्मिता कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियानांतर्गत बुद्ध विहार परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानात परिसराची साफसफाई, कचरा निर्मूलन तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. स्वच्छ व सुंदर परिसर निर्माण करण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी वीरेंद्र अंबुलकर, सुमेध लोणे, नरेंद्र पाढेन, दौलतराव कांबळे, देवागीनी कांबळे, प्रा. घनश्याम धाबर्डे, नरेंद्र ताकसांडे, वाघमारे, बनसोड, दुपटे आदींनी प्रत्यक्ष श्रमदान करून स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. उपस्थितांनी स्वच्छता ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगत परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

### भीमोदय बुद्ध विहारात 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' विषयावर साप्ताहिक प्रबोधन

**नागपूर :** राष्ट्रीय बौद्ध महासभा (RBM) आणि भीमोदय मंडळ बुद्ध विहार, विश्वकर्मा नगर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता भीमोदय बुद्ध विहार येथे साप्ताहिक धम्म प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रबोधन कार्यक्रमात राष्ट्रीय बौद्ध महासभेचे धम्म प्रशिक्षक गुलचंद बौद्ध हे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. बुद्धांच्या धम्मातील मानवी मूल्ये, प्रज्ञा, करुणा, समता आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांचे योगदान याविषयी ते उपस्थितांना सविस्तर माहिती देणार आहेत. भीमोदय बुद्ध विहारात दर गुरुवारी नियमितपणे धम्म प्रबोधनाचे आयोजन केले जाते. या उपक्रमाद्वारे समाजात धम्मविषयक जागृती निर्माण करण्याचा तसेच बुद्धांच्या शिकवणीचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आयोजकांनी सर्व धम्मबंधू-भगिनींनी आणि नागरिकांनी या साप्ताहिक प्रबोधन कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# औद्योगिक आणि खाजगी क्षेत्राला आरक्षण बंधनकारक करा 'ASRA' ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

### रोजगारात सरकारी वाटा ५% पेक्षा कमी

**नागपूर :** बदलत्या आर्थिक धोरणांमुळे आणि शासकीय क्षेत्रातील कंत्राटीकरणामुळे एकूण उपलब्ध रोजगारात सरकारी नोकऱ्यांचा वाटा आता ५ टक्क्यांपेक्षाही कमी झाला आहे. यामुळे मागासवर्गीय घटकांच्या (SC, ST, OBC) घटनात्मक प्रतिनिधित्वावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला असून, शासनाकडून सवलती व अनुदान घेणाऱ्या सर्व औद्योगिक प्रकल्पांना 'महाराष्ट्र आरक्षण अधिनियम २००१' अंतर्गत तात्काळ आरक्षणाचे नियम लागू करावेत, अशी आग्रही मागणी 'असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (ASRA) चे अध्यक्ष संजय थुल यांनी राज्य सरकारकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री यांना एक सविस्तर निवेदन सादर केले आहे.निवेदनात नमूद केल्यानुसार, संविधानाने वंचित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात दिलेले आरक्षण हे केवळ शासकीय आणि सार्वजनिक क्षेत्रापुरते (PSU) मर्यादित आहे. मात्र, सध्या खाजगी क्षेत्रात ७५ ते ८० टक्क्यांहून अधिक रोजगार निर्माण होत असून सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण झपाट्याने घटत आहे. परिणामी, आरक्षणाचा मूळ उद्देश आणि सामाजिक न्यायाची चौकटच धोक्यात आली आहे. सार्वजनिक संसाधने घेणाऱ्या संस्थांचे सामाजिक उत्तरदायित्व काय? 'ASRA' चे अध्यक्ष संजय थुल यांनी निवेदनात स्पष्ट केले की, राज्यातील बहुतांश मोठे औद्योगिक प्रकल्प आणि खाजगी आस्थापना या शासनाच्या मदतीवर उभ्या आहेत. यामध्ये त्यांना थेट आर्थिक भांडवली सबसिडी (Capital Subsidy), जीएसटी (GST) व मुद्रांक शुल्कात (Stamp Duty) सवलत, वीज दरात सवलत तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे (MIDC) अत्यंत सवलतीच्या दरात भूखंड उपलब्ध करून दिले जातात. 'हा सर्व जनतेचा पैसा आणि सार्वजनिक संसाधने आहेत. जर हे उद्योग शासकीय बळावर नफा कमवत असतील, तर त्यांनी समाजातील वंचित घटकांप्रती सामाजिक उत्तरदायित्व (Social Justice) पार पाडणे अनिवार्य आहे,' असे थुल यांनी म्हटले आहे. कायद्यात सुधारणा करण्याची मागणी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी निवेदनात 'महाराष्ट्र राज्य सार्वजनिक सेवा अधिनियम, २००१' च्या कलम २ मधील 'आस्थापना' आणि 'शासकीय अनुदानित संस्था' या व्याख्यांचा विस्तार करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाने तात्काळ खालील पावले उचलावीत असे निवेदनात सुचवले आहेः व्याख्या बदलणे : शासकीय निधी, सवलती किंवा जमीन घेणाऱ्या सर्व खाजगी कंपन्या आणि प्रकल्पांना तांत्रिकदृष्ट्या 'शासकीय अनुदानित संस्था' म्हणून घोषित करावे. करारनाम्यात अट (MoU Clauses) : उद्योग विभागामार्फत जेव्हा कोणत्याही खाजगी समूहाशी नवीन सामंजस्य करार (MoU) केला जाईल, तेव्हाच 'आरक्षणाचे नियम पाळण्याची' अट बंधनकारक करावी. विशेष अध्यादेश : जोपर्यंत कायद्यात कायमस्वरूपी सुधारणा होत नाही, तोपर्यंत विशेष अध्यादेश काढून या कंपन्यांना रोजगारात मागासवर्गीयांना प्राधान्य देण्याचे निर्देश द्यावेत. खाजगीकरणाच्या या युगात जर बहुजन समाजाला रोजगाराच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ठेवले गेले, तर राज्यात मोठी आर्थिक विषमता निर्माण होईल. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या गंभीर विषयाची दखल घेऊन 'महाराष्ट्र आरक्षण अधिनियम २००१' च्या कक्षेत सुधारणा करावी, अशी मागणी संजय थुल आणि 'ASRA' संघटनेच्या वतीने करण्यात आली.

# बीडीएसपी संघाची पालकांसह मुलांच्या शिबिराची संकल्पना समाजाने स्विकारावी : प्रा. सरोज वाणी



**नागपूर :** बीडीएसपी संघाच्या क्रांतीसूर्य नगर युनिटतर्फे आयोजित केलेल्या पालकांसह मुलांच्या शिबिरात प्रा. सरोज वाणी यांनी मार्गदर्शन करताना अशा प्रकारची शिबिरे आदर्श समाज निर्मितीसाठी अत्यंत प्रभावी ठरू शकतात, असे प्रतिपादन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, मुलांना जन्म देऊन पालकांची जबाबदारी संपत नाही. त्यांना सुसंस्कारित, जबाबदार आणि मानवतावादी नागरिक बनविण्याची जबाबदारीही पालकांनी स्वीकारली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षित केलेला आदर्श समाज घडविण्यासाठी मुलांच्या सर्वांगीण विकासासोबत त्यांच्यावर योग्य संस्कार होणे आवश्यक आहे. वस्त्यावस्त्यांत अशा प्रकारची शिबिरे आयोजित केल्यास पालकांमध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण होऊन मुलांच्या संगोपनाकडे अधिक सजगपणे पाहिले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सकाळी ५ ते ८ या वेळेत पार पडलेल्या तीन तासांच्या शिबिराची सुरुवात आनापानसती ध्यान साधनेने झाली. सहभागी पालक व मुलांना ध्यानाचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले तसेच मनाची एकाग्रता, आत्मपरीक्षण आणि मानसिक स्वास्थ्य याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रा. सरोज वाणी यांनी उपस्थितांना सामूहिकरित्या त्रिशरण आणि पंचशील दिले. धम्माचे केवळ पठण न करता त्याचे दैनंदिन जीवनातील आचरण किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत स्पष्ट केले. पंचशीलाचा मराठी अनुवाद समजावून सांगत त्याचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. यावेळी शिबिरार्थींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'वेटिंग फॉर अ व्हिसा' हे पुस्तक भेट देण्यात आले. अंतिम सत्रात सहभागी पालक व मुलांनी मनोगते व्यक्त करत शिबिरातून मिळालेल्या सकारात्मक ऊर्जेचा आणि नव्या प्रेरणेचा अनुभव मांडला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी केशवराव हिरे, डॉ. आनंद गजभिये, वाल्मिक रामटेके, मीनाक्षी सायरे, जोती जय गायसुंदरे, ॲड. विश्वजीत, संगीता शालिग्राम वानखडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप प्रा. सरोज वाणी यांनी मंगल मैत्री व धम्म पालन गाथेने केला.

# मोती, मशरूम आणि रेशीम उत्पादनावरील संयुक्त कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागपूर :** चेंज अवर कम्युनिटी स्टेट्स ऑर्गनायझेशनतर्फे छत्रपती चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात उन्नत कृषी व्यावसायिक जागरूकता अभियानांतर्गत प्रथमच मोती, मशरूम आणि रेशीम उत्पादनावरील संयुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उच्च मूल्य आणि मोठी बाजारपेठ असलेल्या या व्यवसायांचे वैज्ञानिक पद्धतीने घरच्या घरी उत्पादन करण्याचे प्रशिक्षण सहभागींना देण्यात आले. महाराष्ट्रातील जळगाव, सातारा आणि नाशिक येथील नवउद्योजक, गृहिणी, निवृत्त व्यक्ती तसेच दिव्यांग नागरिकांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. संस्थापक अध्यक्ष सुमेद फुलझेले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. महेंद्र ढवळे (उपसंचालक, रेशीम), राज गायकवाड (राज्य जीएसटी अधिकारी), श्रद्धानंद गणवीर (प्रदिक्षा हर्बल) आणि संदीप देशमुख (सुरभी कला) यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत उत्पादन, विक्री, शासकीय व निमशासकीय कर्ज, अनुदान तसेच उद्योजकतेच्या संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सहभागींना मोफत उद्यम आधार प्रमाणपत्र व प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच जेवण, स्टडी मटेरियल, चहा आणि ज्यूसची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी सुमेद फुलझेले, सतीश सरोदे, विलास शेवाळे, रंजिता शंभरकर, माया सीमा माटे, समर्थ तभाने, सुहास सुदामे, अमर नायसे आणि भारती हिरेखन यांनी परिश्रम घेतले. औचित्य बहुउद्देशीय संस्था, आशीर्वाद फाउंडेशन तसेच सरोदे बहुउद्देशीय सामाजिक, औद्योगिक व शैक्षणिक संस्था यांचे विशेष सहकार्य लाभले.

# आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती नाशिकची बैठकीत सर्व ५९ अनुसूचित जातींना एकत्रित लढ्याचे आवाहन



**नाशिक :** आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्याविरोधात सक्रिय असलेल्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीची बैठक ९ जून २०२६ रोजी नाशिक येथे पार पडली. डॉ. प्रवीण गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मागील बैठकीचा आढावा घेण्यात आला आणि पुढील काळातील सक्रिय कार्ययोजना आखण्यात आली. बैठकीत जिल्हा दौरा, आर्थिक निधी उभारणी, बुद्ध विहार भेटी आणि विविध ठिकाणी ग्रुप भेटी घेण्याचे नियोजन करण्यात आले. समितीच्या आर्थिक बाबींची माहिती सादर करण्यात आली. यावेळी माजी न्यायाधीश अनिल वैद्य, बॉबी काळे, समाज रक्षक अर्जुन नाना पगारे, किशोर गांगुर्डे यांच्या विविध योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. सर्व ५९ अनुसूचित जाती एकत्रित लढा हाच महत्वाचा संदेश या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला. बैठकीत सर्व समाज घटकांना एकत्र घेऊन लढा उभारण्यावर विशेष भर देण्यात येईल असे ठरले. "उपवर्गीकरण रद्द होण्यासाठी सर्वांनी सक्रिय व्हावे," असा स्पष्ट संदेश देण्यात आला. हेतू शुद्ध ठेवून महाराष्ट्रातील सर्व ५९ अनुसूचित जातींना एकत्रित करण्याची मोठी संधी समितीला उपलब्ध असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. शाहू महाराज जयंतीनिमित्त जिल्हाभरात कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. समितीचे निमंत्रक अनिल गांगुर्डे यांनी झोपडपट्टीतील कामाबाबत माहिती दिली. कुणाल वाघ यांनी लढा पुढे नेण्यासाठी सविस्तर ॲक्शन प्लॅन सादर केला. यामध्ये जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना निवेदन देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. बैठकीत राज्यस्तरीय उपवर्गीकरणविरोधी परिषद घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. सुनील साळवे व लक्ष्मी ताठे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व पुष्पगुच्छ देण्यात आले. नवीन पदाधिकारी नियुक्त करण्यात आले. बैठकीत समितीच्या नाशिक संघटक म्हणून सुनील साखरे, उपाध्यक्ष गणेश तुपसुंदरे आणि सचिव पंडित पाडमुख यांची नियुक्ती करण्यात आली. माजी न्याय. अनिल वैद्य, डॉ. अविनाश शिंदे, सनी रोकडे, कुणाल वाघ, समितीचे अध्यक्ष प्रकाश पगारे, बैठकीचे अध्यक्ष प्रवीण गांगुर्डे आदींनी आपले विचार मांडले. पुढील सर्व कार्यक्रम समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन यशस्वी करण्याचा ठराव करण्यात आला. याप्रसंगी कार्याध्यक्ष सनीभाई रोकडे, मुख्य निमंत्रक डॉ. अविनाश शिंदे, मार्गदर्शक माजी न्यायाधीश तथा जेष्ठ विचारवंत अनिल वैद्य, माजी नगरसेवक प्रा. कुणाल वाघ, जिल्हा उपाध्यक्ष किशोर गांगुर्डे, महिला आघाडी प्रमुख लक्ष्मी ताठे, अरुण दोंदे, कैलास तेलोरे, सुनिल साळवे, प्रतिक पगारे, प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते. या बैठकीतून आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात एकजुटीचे आणि संघटित लढ्याचे संकेत मिळाले आहेत. समितीने आखलेल्या कार्ययोजनेच्या यशस्वी अंमलबजावणीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर देशाची पुनर्रचना आवश्यक : डॉ. एन. व्ही. ढोके




**भंडारा :** स्थैर्य, शांती आणि प्रगती साध्य करायची असेल तर भगवान बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक मार्गदर्शनावर जागतिक पातळीवर देशाची पुनर्रचना करावी लागेल, असे प्रतिपादन लेखक, विचारवंत व विज्ञान संस्थेचे निवृत्त प्राध्यापक डॉ. एन. व्ही. ढोके यांनी केले. भंडारा येथील सामाजिक न्याय भवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट कल्चरल असोसिएशन, भंडारा व महाराष्ट्र एसएससी प्राध्यापक असोसिएशन ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुस्तक विमोचन, आचार्य पदवी प्राप्तधारकांचा गौरव तसेच विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या सत्कार समारंभात ते संमेलनाध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी डॉ. परमानंद बागडे लिखित 'Psychology of Caste (जातीचे मानसशास्त्र)' या पुस्तकासह विविध संशोधनपर पुस्तकांचे विमोचन करण्यात आले. आपल्या मनोगतात डॉ. परमानंद बागडे यांनी अस्पृश्यता ही जातव्यवस्थेचे विकृत अपत्य असून ती एक मानसिक अवस्था असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमात विजय सावंध, डॉ. रतनकुमार गेडाम आणि प्रवीण कांबळे यांनी विश्लेषक म्हणून आपले विचार मांडले. प्रा. सुदर्शन कोवे (अमरावती), प्रा. शैलेंद्र नंदा गवळी (तुमसर), प्रा. सुधाकर झळके, सहाय्यक आयुक्त भंडारा, तसेच प्रा. मारुती वानखेडे (नागपूर) यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा. डॉ. आशिष बोरकर, डॉ. गीतांजली नागदिवे, डॉ. आम्रपाली भिवगडे, प्रा. डॉ. बाळकृष्ण रामटेके, प्रा. डॉ. अमरदीप जाधव, प्रा. डॉ. मंगेश वाहने, प्रा. प्रियंका विलास मेश्राम, तुळशीदास रामटेके, प्रशांत जांभुळकर, सरिता बडोले, सुभाष गोंडाणे, हरेंद्रकुमार बांबुर्डे आणि प्रा. डॉ. नरेश धुर्वे यांचा आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल सन्मान केला. हा सत्कार प्रा. डॉ. प्रशांतजीत चिखलीकर, प्रा. डॉ. बबन मेश्राम, प्रा. डॉ. केशव मेंढे आणि प्रा. डॉ. विनोद गजघाटे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन केला. तसेच विविध प्राध्यापकांनी संशोधनपर लेखन केलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करून त्यांचा शाल, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरव केला. यामध्ये प्रा. डॉ. देवेंद्र सोनटक्के, प्रा. डॉ. पुण्यशील टेंभुर्णे, प्रा. डॉ. बंडू जामनिक, प्रा. डॉ. प्रमोद तायडे, प्रा. डॉ. सुधाकर झळके, प्रा. डॉ. नंदकिशोर भगत, प्रा. डॉ. रजनीश बांबोडे, प्रा. डॉ. सुभाष गवई, प्रा. डॉ. पुरुषोत्तम संबोधी, प्रा. डॉ. रक्षित बागडे, प्रा. डॉ. विलास मेश्राम, प्रा. सोनकांबळे आणि प्रा. डॉ. विजय घुबडे यांचा समावेश होता. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचाही सत्कार केला. यामध्ये मनदीपसिंग कोहली, वत्सला जांभुळकर, जयमाला शिंगाडे, प्रा. डॉ. मुकुंद दखणे, प्रणिता मेश्राम, अनिता नंदागवळी, प्रा. डॉ. प्रशांतजीत चिखलीकर आणि जयेंद्र देशपांडे यांचा समावेश होता. नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रफुल्ल आपटे, सुनील राऊत, अनिल दिघोरे, प्रशिक वानखेडे, अश्विनी हुमणे आणि स्नेहल गडेकर यांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सत्कार प्रा. डॉ. केशव मेंढे, रमेश सोमकुवर आणि डॉ. किशोर कुंभरे (निवृत्त सहआयुक्त, पशुसंवर्धन विभाग) यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व रूपरेषा संयोजक प्रा. डॉ. देवेंद्र सोनटक्के यांनी मांडली. एस. एच. गणेर यांनी संचालन केले, तर प्रा. डॉ. पुण्यशील टेंभुर्णे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिल पाटील, अनिल खोब्रागडे, मुरलीधर भैसरे, जयेंद्र देशपांडे, कोमल सोनटक्के, अभिषेक डोक, संजू श्रीरामे, सुदर्शन कोवे आणि बंडू जामनिक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रदीप कडबे यांना 'कर्तव्यदक्ष आदर्श समाज प्रबोधनकार पुरस्कार-२०२६'



**भंडारा :** प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सम्यक बुद्ध विहार, पहेला येथे आयोजित कार्यक्रमात रामटेक तालुक्यातील किरणापूर येथील प्रबोधनकार भीमशाहीर तथा पत्रकार प्रदीप बागवान कडबे यांना सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता व आंबेडकरी चळवळीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'कर्तव्यदक्ष आदर्श समाज प्रबोधनकार पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण दशरथ सुरडकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खुशाल बोपचे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चैताली भस्मे, अश्विनकुमार वघाले, वैशाली मडावी, गोकुळसिंग राजपूत, प्रकाश सोनवाने, रोशन जांभुळकर, चंद्रशेखर टेंभुर्णे, शिवशंकर मुंगाटे, गणेश पारधी, प्रदीप कडबे, सदानंद मोरे व उमेश बोरकर उपस्थित होते. यावेळी भावेश कोटांगडे, तनुजा नागदेवे, पंकज रहांगडाले, श्रीकांत नागदेवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संजीव भांबोरे यांनी केले तर संचालन संजना भांबोरे यांनी केले. कार्यक्रमाला गायक-कलावंत, समाजबांधव व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अमरावतीत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**अमरावती :** शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी मिशन आयएएस, डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी, प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट व त्रिवेणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथील सिकची रिसॉर्टमध्ये भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये राज्यस्तरीय चौथे स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन, नव्याने आयएएस झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, गीतगायन कार्यक्रम तसेच समाजाभिमुख महिला, साहित्यिक व कवयित्रींचा गौरव करण्यात आला. संमेलनाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला भाग्यश्री बानाईत, डॉ. चेतन शेलोटकर, हेमकृष्ण फिसदे व रेणुका केनन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. जयश्री कुलकर्णी, सुचिता बर्वे, शीतल राऊत, रंजना कराळे, पल्लवी यादगिरे, कांचन उल्हे, दीपाली बाभुळकर, आरती नागपुरे, डॉ. शुभांगी इंगोले, शिवांगी वेरूळकर, छायाताई पाथरे, ज्योती देशपांडे, अनीता रामटेके, सुलभा गोगरकर, शालिनी कावरे, माधुरी चव्हाण, मंजू वानखडे, सीमा भांदर्गे, सुशीला मळसने, छाया राऊत, सरिता काठोळे, योगिता भुसारी, प्रभा आवारे, वर्षा भाकरे, मंजुश्री देशमुख, अंजली वारकरी, इंदु गावंडे, मनाली तायडे, स्वप्नाली देशमुख, प्रतिभा रोडे, वर्षा कडू, वर्षा ठाकरे, ज्योत्स्ना शेटे, हर्षा ढोके, वर्षा धाबे, सुरेखा धर्माळे, मंजुषा पाथरे, शोभना देशमुख व स्मिता गोळे यांचा सावित्रीबाई फुले यांच्यावरील गौरवग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात देवेंद्र खडसे, प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, सचिन माळकर, डॉ. पंजाबराव कथे, पल्लवी एरुळकर, प्रवीण वासनिक, आबासाहेब कडू, राज कपूर डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला साहित्य, शिक्षण, समाजसेवा व महिला सक्षमीकरण क्षेत्रातील व्यक्तींची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

### १०५ विद्यार्थी व ५० पालकांचा सहभाग; अध्ययन कौशल्य आणि जीवनध्येयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

# चंद्रपुरात व्यक्तिमत्व विकास व करिअर मार्गदर्शन कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**चंद्रपूर :** म. ज्योतिबा फुले तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती, चंद्रपूर आणि स्टुडंट केअर असोसिएशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने म. ज्योतिबा फुले तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती सभागृह, वडगाव येथे आयोजित दोन दिवसीय निवासी व्यक्तिमत्व विकास, अध्ययन कौशल्य व करिअर मार्गदर्शन कार्यशाळेला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेत १०५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला, तर ५० पालकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यशाळेचे उद्घाटन चेतन उंदिरवाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविक व समितीच्या प्रतिनिधींच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दोन दिवसांच्या या कार्यशाळेत महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेत अनिल रामटेके, ममता रामटेके, सुनील तलवारे, शैलेश रामटेके, सुमेध लाकडे, धीरज साखरे, डॉ. अतुल शेंदरे, दिलीप वावरे, मधुसूदन रुंगठा, समीर रामटेके आणि सुमित मेश्राम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत व्यक्तिमत्व विकास, अध्ययन कौशल्य, मानसिक आरोग्य, आर्थिक साक्षरता आणि जीवनध्येय याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादरीकरणे करून कार्यशाळेतून मिळालेल्या अनुभवांची मांडणी केली. समारोप कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्रपूर स्कॅन टीमचे सदस्य, फिरोजकुमार घडसे, सूरज वनकर, माधव बुरे तसेच सर्व अभ्यासिका समन्वयकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन आकाश फुलझेले, आफ्रिन शेख, अमोल वर्मा आणि मानसी रामटेके यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक देवगडे यांनी केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648